2025 नूतनवर्षाभिनंदन

नव्या आशा, नवी उमेद व नाविन्याची
कास धरत नवीन वर्षाच स्वागत करु,
आपली सर्व स्वप्न, आशा,
आकांक्षा पूर्ण होवोत या प्रार्थनेसह,
नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

दै. बीड **सुपरफास्ट** www.beedsuperfast.com

संपादक : अतुल शंकरराव जाधव

बीड (महाराष्ट्र राज्य) ◆ वर्ष ४ थे ◆ अंक १ ◆ बुधवार, दि.१ जानेवारी २०२५ ◆ RNI : MAHMAR/2023/84694 ◆ पाने ४ ◆ अतुल शंकरराव जाधव ◆ किंमत ४ रुपये

BEED (Maharashtra State) ◆ Volume:4 ◆ Issue 1 ◆ WEDNESDAY, 1 JANUARY 2025 ◆ RNI : MAHMAR/2023/84694 ◆ Pages 4 ◆ Atul Shankarrao Jadhav ◆ Price 4


अग्रलेख
नव्या वर्षाचे पसायदान

# वाल्मिक कराड पुणे सीआयडीला शरण

## चौकशीसाठी बीडला रवाना

◆ पुणे (प्रतिनिधी) :

अखेर फरार वाल्मिक कराड मंगळवारी पुण्यातील सीआयडी मुख्यालयात शरण आले. बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणी वाल्मिक कराड यांची चौकशी करण्यात आली. दरम्यान, या ठिकाणी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या परिसरात आधीपासूनच वाल्मिक कराड यांचे समर्थक थांबलेले होते. त्यावरून आजच वाल्मिक कराड हे पोलिसांना शरण येणार होते, या विषयी कार्यकर्त्यांना माहिती होती. दरम्यान, कराड हे शरण आल्यावर त्यांना सीआयडी मुख्यालयात नेण्यात आले असून, अधिकाऱ्यांकडून त्यांची चौकशी करण्यात आली.

कराडच्या शरणागतीबाबत सीआयडी अधिकारी सारंग आवाड यांनी माहिती दिली. केज पोलीस ठाण्यात वाल्मिक कराड याच्यावर गुन्हा दाखल आहे. गुन्हा घडल्यानंतर तीन आठवड्यापासून आरोपी फरार होता. तो आज सकाळी साडे बाराच्या सुमारास स्वतः सीआयडी मुख्यालयात हजर झाला.



### वाल्मिक कराड ३ दिवस पुण्यातच होता

वाल्मिक कराड सोबत आलेल्या एका माजी नगरसेवकाने कराड गेल्या तीन दिवसांपासून पुण्यातच असल्याचा खुलासा केला आहे. कराडवर खोटे आरोप करण्यात आले. ते स्वतःहून हजर झाले आहेत. खोट्या आरोपांमुळे ते घाबरले असतील म्हणून ते पोलिसांसमोर आले नसतील, असेही या नगरसेवकाने म्हटले आहे. यामुळे कराडचा शोध घेणाऱ्या पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

### न्यायदेवता जी शिक्षा देईल ती भोगायला तयार

सीआयडीला शरण जाण्यापूर्वी कराडने एक व्हीडिओ जारी केला आहे. यामध्ये त्याने केज पोलीस स्टेशनला खोटी खंडणीची फिर्याद दाखल झाल्याचा आरोप केला आहे. मी सीआयडी ऑफिस पुणे येथे सरेंडर होत आहे. संतोष देशमुख यांचे जे कोणी मारेकरी असतील त्यांना अटक करावी, फाशी द्यावी. राजकीय द्वेषापोटी माझे नाव त्याच्याशी जोडले जात आहे. पोलीस तपासात जर मी दोषी दिसलो तर न्यायदेवता जी शिक्षा देईल ती भोगायला तयार आहे, असे वाल्मिक कराड याने स्पष्ट केले आहे.

### वाल्मिक कराडची संपत्ती जप्त करावी

वाल्मिक कराड याच्या घरातील लोकांची चौकशी सुरू झाली, म्हणून तो शरण आलेला आहे. त्याची संपत्ती लवकरात लवकर जप्त करावी. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या ॲक्शनमुळे वाल्मिक कराड याला शरण यावे लागले. तीन आरोपी अजून बाकी आहेत. मुख्यमंत्र्यांनी मोक्का बाबत घोषणा केली आहे. खंडणीसह इतर गुन्हे देखील त्यांच्यावर लागतील, असे आमदार सुरेश धस यांनी म्हटले आहे. वाल्मिक कराडला सीआयडीने अटक केल्यानंतर आमदार धस यांनी सह्याद्री अतिथिगृहावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

### आधीच आत्मसमर्पण करायला हवे होते

मी माझ्या कार्यक्रमांमध्ये व्यस्त होतो. माध्यमांकडूनच मला ही माहिती मिळाली आहे. हत्या प्रकरणामध्ये संबंध असल्यास वाल्मिक कराडला अटक व्हायला हवी. कोणत्या गुन्हाअंतर्गत अटक करावी हे पोलिसांनी पाहायला हवे. ९ तारखेला संतोष देशमुख यांची हत्या झाली. या घटनेला आता वीस-बावीस दिवस झाले. जर खंडणीचा गुन्हा होता, तर त्याने आधीच आत्मसमर्पण करायला हवं होतं. त्याने सीआयडीसमोर आता सरेंडर केले आहे, असे म्हणत खासदार बजरंग सोनावणे यांनी कराड यांच्या सीआयडीसमोरील शरणागतीच्या संदर्भात प्रश्न केले.

### राजकारण बाजूला ठेवून एकत्र लढावे

परभणी आणि बीड या दोन्ही घटना महाराष्ट्राला अस्वस्थ करणाऱ्या आहेत. शरण आले तरी समाधान होत नाही, उलट त्याला अटक झाली पाहिजे होती. पोलीस आणि मीडिया त्याला शोधत होते. महाराष्ट्राचे पोलीस हे भारताची शान आहेत. जोपर्यंत त्या कुटुंबीयाला न्याय मिळत नाही तोपर्यंत राजकारण बाजूला ठेवून एकत्र लढावे. बीडच्या त्या पोलीस अधीक्षकांची बदली झाली, त्यामागे त्याची चूक नसावी यामागे कोणाचे षडयंत्र आहे? कोणाची ताकत आहे हे माहिती नाही, असेही खासदार सुप्रिया सुळे यावेळी म्हणाल्या.

### तपासामध्ये सीआयडीला पूर्ण स्वायत्ता



■ संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील प्रत्येक आरोपीवर कडक कारवाई करण्यात येईल. सर्व दोषी जोपर्यंत फासावर लटकत नाहीत, तोपर्यंतची सर्व कारवाई पोलीस करतील. गुंडांचे राज्य आम्ही चालू देणार नाही. त्या आनुषंगाने आम्ही तपासाला गती दिल्यानेच वाल्मिक कराड यांना शरणागती पत्करावी लागली. कुठलाही आरोपी आम्ही सोडणार नाही. जे जे पुरावे आहेत, त्याच्या आधारावर कुणालाही सोडणार नाही, हे मी सांगतो.

■ जाणीवपूर्वक ही केस सीआयडीकडे देण्यात आली असून त्यांना पूर्ण स्वायत्ता देण्यात आली आहे. कुणाचाही दबाव त्यांच्यावर राहणार नाही, कोणताही दबाव चालून घेतला जाणार नाही.
मला या प्रकरणातील राजकारणावर जायचे नाही.

■ माझ्याकरिता स्व. संतोष देशमुख यांच्या हत्येला कारणीभूत लोकांना शिक्षा होणे हे महत्त्वाचे आहे. काही लोकांना केवळ राजकारण महत्त्वाचे आहे. त्यांना त्यांचे राजकारण लखलाभ, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.



# महाराष्ट्र राज्याला कत्तलखानामुक्त करणार

## मंत्री नितेश राणे यांनी दिली माहिती

◆ पुणे (प्रतिनिधी) :

गोमातेकडे कुणीही वाकड्या नजरेने बघण्याची हिंमत होणार नाही. हिंदू म्हणून थाटात फिरा. कुणाला घाबरण्याची आवश्यकता नाही. जो अधिकारी गाईच्या कत्तलीला प्रोत्साहन देत असेल, त्याचे फक्त नाव द्या. गाईला राज्यमातेचा दर्जा देणारे महायुती सरकार आहे. गोरक्षकांनी आता चिंता करण्याची आवश्यकता नाही. गोहत्या बंदीचा कायदा आणखी कडक करण्यासाठी आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी करणार आहोत. आगामी काळात महाराष्ट्राला कत्तलखानामुक्त करणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे कॅबिनेट मंत्री नितेश राणे यांनी केले आहे.

महाराष्ट्रात महादेवाच्या नंदीचे व गोमातेच्या रक्ताचे वाहणारे पाट थांबवून शेतकरी समृद्ध व्हावेत, यासाठी पुण्याचे आराध्य दैवत भगवान श्री ओंकारेश्वराच्या प्राचीन मंदिरात महाआरती करण्यात आली.

राज्यात गोहत्या बंदी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी व गोरक्षकांच्या मागण्यांसाठी महायुती सरकारकडे पाठपुरावा करणार आहोत. या पुढील काळातही गोसंवर्धनासाठी शेती-माती-संस्कृतीसाठी कटिबद्ध आहोत. कायदा असतानाही गोहत्या केली जात असेल तर भगवाधारी महायुतीच्या सरकारमध्ये कुणाचेही लांगुलचालून करू देणार नाही. कायदा प्रत्येकाला पाळावा लागेल, असा इशारा राज्याचे नितेश राणे यांनी दिला आहे.

> आमची सगळी मुले गोरक्षणासाठी दिवस-रात्र पळत आहेत. हिंदुत्वाचा विचार जपत गो-सेवक निःस्वार्थपणे काम करीत आहेत. हिंदू धर्मातील अठरापगड जाती, बारा बलुतेदार या सर्वांना सोबत घेऊन देव-देश अन् धर्म रक्षणासाठी कटिबद्ध आहोत. गोमातेच्या रक्षणासाठी जीव धोक्यात घालून काम करणारे गोरक्षक यांच्या पाठीशी महायुती सरकार राहणार आहे.
>
> - **महेश लांडगे**, भाजपा आमदार

## वेचक

### बुकिंग वेळी आयआरसीटीसीची वेबसाइट पुन्हा ठप्प

**नवी दिल्ली :** इंडियन रेल्वे केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशन ॲप आणि वेबसाइट पुन्हा एकदा डाऊन झाली. आयआरसीटीसी ॲप व वेबसाइटला आऊटेजचा सामना करण्याची डिसेंबरमधील ही तिसरी वेळ आहे. हजारो यूजर्संना आयआरसीटीसी प्लॅटफॉर्मवर लॉगिंग करण्यात अडचणी आल्या. अनेकांना त्यांची तिकिटे खरेदीही करता आली नाहीत. सकाळी १० च्या सुमारास अनेकांनी 'तत्काल' तिकिटे बुक करण्याचा प्रयत्न केला; तेव्हा त्यांना आऊटेजची समस्या जाणवली. याबाबत सोशल मीडियावर लोकांनी नाराजी व्यक्त केली.

### व्हॉलीबॉल खेळताना पोलिसाचा मृत्यू

**नवी दिल्ली :** बिहारमधील दरभंगा जिल्ह्यात मैदानावरच व्हॉलीबॉल खेळताना हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने एका पोलिसाचा दुर्दैवी मृत्यू झाला. रात्री उशिरा बिहार पोलीस कॉन्स्टेबल संजीव कुमार यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. संजीव कुमार हे पोलीस लाईनमध्ये व्हॉलीबॉल खेळण्यासाठी गेले होते. यादरम्यान त्यांची प्रकृती बिघडली. उपस्थित सहकाऱ्यांनी त्यांना डीएमसीएचमध्ये उपचारासाठी दाखल केले.

### बावनकुळेंकडून पीएम मोदींना जगदंबेची मूर्ती भेट

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी कोराडीच्या महालक्ष्मी जगदंबेची काष्ठशिल्पातील मूर्ती भेट दिली. महसूलमंत्री झाल्यावर बावनकुळे यांनी पहिल्यांदाच पंतप्रधान मोदी यांची सदिच्छा भेट घेत कोराडीच्या जगदंबेच्या दर्शनासाठी आपण येण्याची विनंती पंतप्रधानांना बावनकुळे यांनी केली. राज्यात पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यासाठी पंतप्रधानांनी मार्गदर्शन केले.

# महाराष्ट्र माझ्या पाठीशी उभा राहिला

## धस यांच्या माफीनाम्यानंतर प्राजक्ता झाली व्यक्त

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

मराठमोळी अभिनेत्री प्राजक्ता माळीचा एक व्हीडिओ इन्स्टाग्राम हँडलवर व्हायरल होत आहे. प्राजक्ता माळीने आमदार सुरेश धस, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांचे आभार देखील मानले आहेत.

आमदार सुरेश धस यांनी प्राजक्ताची व समस्त महिला वर्गाविषयी चुकीचे वक्तव्य केले गेले असेल तर दिलगिरी व्यक्त केली. माझ्या वक्तव्याचा गैर अर्थ घेतला, असे त्यांनी म्हटले.



यानंतर प्राजक्ताने सोशल मीडियावर व्हीडिओ शेअर करत तिची प्रतिक्रिया शेअर केली.

सोशल मीडियावर शेअर केलेल्या व्हीडिओमध्ये प्राजक्ता म्हणाली की, सबंध महाराष्ट्राचे मी सर्वप्रथम मनापासून आभार मानते. पत्रकार परिषद घेतल्या क्षणापासून ते आतापर्यंत मी आणि माझ्या कुटुंबीयांनी शेकडो फोन कॉल्स, मेसेजेस, सोशल मीडिया टॅग रिसिव्ह केले. महिलांच्या सन्मानासाठी सर्व स्तरातून आवाज उठवला गेला. समर्थन दिले गेले. यामुळे आम्हाला फार बळ मिळाले.



मुंबईकरांनी सरत्या वर्षाला निरोप देत नवीन वर्षाच्या स्वागतासाठी मरिन ड्राईव्ह या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. वर्षातील शेवटच्या दिवशी शेवटच्या सूर्यास्ताला निरोप देण्यासाठी आणि सूर्यास्ताचे फोटो मोबाईलमध्ये घेण्यासाठी मुंबई, मुंबई उपनगर आणि आजूबाजूच्या परिसरातील लोकांनी मरिन ड्राईव्ह इथे मोठी गर्दी केली होती.

# पर्यटकांचा कुडाळमध्ये धिंगाणा

## मुंबईतील पर्यटकांनी स्थनिकांना केली मारहाण

**कुडाळ (प्रतिनिधी) :** नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी पर्यटकांना पर्यटन स्थळांवर गर्दी केली आहे. कोकणात मोठ्या संख्येने पर्यटक दाखल झाले आहेत. कुडाळ बाजारपेठेत पर्यटकांनी स्थानिकांशी



हुज्जत घालत मारहाण केल्याची घटना घडली आहे. इनोवा कारने तीन दुचाकी वाहनांना धडक दिल्यावरुन वादावादी झाली आहे. कुडाळमधील व्यावसायिक आप्पा गडेकर याला इनोवा कारमधील मुंबईमधील महिला पर्यटकांनी हुज्जत घालत बेदम मारहाण केली आहे. पर्यटकांनी कुडाळमध्ये धिंगाणा घातला आहे. हे प्रकरण पोलीस ठाण्यात गेले.

पोलिसांवर दबाव टाकत असल्याच्या संशयावरून कविलकाटे गावातील नागरिकांनी कुडाळ पोलीस स्टेशनमध्ये गर्दी केली होती. पोलीस परस्पर विरोधी तक्रारी घेऊन मिटवण्याचा प्रयत्न करत असताना स्थानिकांना मारहाण का केली? त्या पर्यटकांना आम्हाला सुपूर्द करा अशी मागणी पोलिसांकडे करत आहेत.



### कोरेगाव-भीमाच्या ऐतिहासिक विजयस्तंभास आकर्षक सजावट

**कोरेगाव-भीमा :** येथे १ जानेवारी २०२५ रोजी २०७व्या शौर्यदिनी ऐतिहासिक विजयस्तंभ शौर्यदिन कार्यक्रमानिमित्त प्रशासनाकडून नियोजनाची तयारी जोरात सुरू आहे. यावर्षी भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवाच्या धर्तीवर ऐतिहासिक विजयस्तंभास फुलांची सजावट करताना ७० हजार कृत्रिम व १ हजार किलो खऱ्या फुलांचा वापर करण्यात आला आहे.

# मस्साजोगचे ग्रामस्थ आज करणार जलसमाधी आंदोलन

## सरपंच संतोष देशमुख प्रकरणातील आरोपी २२ दिवस लोटल्यानंतरही फरार

◆ मुंबई (प्रतिनिधी):

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण राज्यभर गाजत असल्याने आरोपींना अटक करण्यासाठी पोलीस व सीआयडीची पथके तयार करण्यात आली आहेत. २२ दिवसांनंतरही आरोपी मोकाट आहेत. त्यामुळे आता मस्साजोगचे ग्रामस्थ जलसमाधी आंदोलन करणार आहेत. १ जानेवारी रोजी ग्रामस्थ नदीत आंदोलन करणार आहेत.



संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या आरोपींना पकडण्यात पोलीस अपयशी ठरल्याचे दिसत आहे. आरोपी मोकाट असून, पोलीस व सीआयडीकडून त्यांचा शोध घेतला जात आहे. आरोपींना अटक करण्यासाठी इतका वेळ लागत असल्याने विरोधकांकडून सरकारला लक्ष्य केले जात आहे. आता मस्साजोगमधील ग्रामस्थांनीही आक्रमक पवित्रा घेतला असून, बुधवारी जलसमाधी आंदोलन करणार आहे. संपूर्ण गावात जलसमाधी आंदोलनाच्या ठिकाणी येण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# नववर्षाच्या प्रारंभीच सरकारकडून प्रशासनात फेरबदल

◆ मुंबई ( विशेष प्रतिनिधी) :

राज्य सरकारने नववर्षाच्या प्रारंभीच राज्यातील प्रशासनामध्ये काही महत्त्वपूर्ण खांदेपालट केले असून सनदी अधिकाऱ्यांना पदोन्नती देत असतानाच नव्या जबाबदाऱ्या सोपवल्या आहेत. त्यामध्ये प्रशांत नारनवरे यांची आयुक्त महिला व बालविकास पुणे येथून सचिव व विशेष चौकशी अधिकारी सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई येथे अंशू सिंह यांच्या जागी सचिव पदावर बढती देत नियुक्ती करण्यात आली आहे.

## ज्येष्ठ सनदी अधिकारी सुरज मांढरे कृषी आयुक्तपदी, तर सचिंद्र प्रताप सिंह नवे शिक्षण आयुक्त

प्रदीप पी यांची नियुक्ती आयुक्त महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ मुंबई येथून मत्स्य व्यवसाय आयुक्त मुंबई येथे करण्यात आली आहे. अतुल पाटणे यांच्या बदलीने ही नियुक्ती करण्यात आली आहे. सुरज मांढरे यांची नियुक्ती राज्याच्या कृषी आयुक्तपदी करण्यात आली असून त्यांच्याकडे युवक आणि क्रीडा आयुक्त पदाची सध्याची जबाबदारी अतिरिक्त कार्यभार म्हणून सोपवण्यात आली आहे. सचिंद्र



प्रताप सिंह यांचे नियुक्ती शिक्षण आयुक्त पुणे या पदावर करण्यात आली असून त्यांच्या जागी ज्येष्ठ सनदी अधिकारी अनिल डिग्गीकर यांना दिव्यांग कल्याण विभागाच्या सचिव पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. रणजीत सिंह देओल जे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे प्रधान सचिव आहेत. त्यांच्याकडे प्रधान सचिव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई याची जबाबदारी सोपवण्यात आली असून आय. ए. कुंदन यांच्या जागीही नियुक्ती करण्यात आली आहे. गीतांजली बाविस्कर यांची नियुक्ती मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ मुंबई या पदावर करण्यात आली आहे. तसेच ज्येष्ठ सनदी अधिकारी निधी चौधरी यांना महाराष्ट्र स्टेट सिलेक्शन कॅडरमध्ये बढती देण्यात आली आहे.

### तळीराम चालकांची वाढली संख्या

**मुंबई (प्रतिनिधी) :** शहरात दारूच्या नशेत वाहन चालवणाऱ्यांची संख्या चार पटीने वाढल्याचे धक्कादायक वास्तव वाहतूक पोलिसांनी केलेल्या कारवाईतून स्पष्ट झाले आहे. गेल्या वर्षी अडीच हजार चालक दारूच्या नशेत सापडले होते. या वर्षी हा आकडा ९,२८७ वर गेला आहे. २०१९ मध्ये ८,७९१ प्रकरणे समोर आली होती.

## पर्यटकांमुळे शिरोडा, तारकर्ली, देवबागकडे जाणाऱ्या मार्गांवरील वाहतूक कोंडी

# थर्टी फर्स्टसाठी मालवणला गर्दीचा महापूर, तर गोव्याकडे फिरवली पाठ

◆ मालवण (प्रतिनिधी) :

जिल्ह्याच्या किनारपट्टीवर हजारो पर्यटक दाखल झाले आहेत. गतवर्षीच्या तुलनेत यंदाचा पर्यटन हंगाम सुसाट आहे. यामुळे लाखोंची उलाढाल होत आहे. जिल्ह्यातील शिरोडा, वेंगुर्ले, देवगड, मालवण या महत्त्वाच्या समुद्रकिनारी पर्यटकांची गर्दी आहे. मोठ्या प्रमाणात आलेल्या पर्यटकांमुळे शिरोडा, तारकर्ली, देवबागकडे जाणाऱ्या मार्गांवरील वाहतूक कोंडी आहे. गुगल मॅपवरील चुकीच्या मार्गांचा त्रास पर्यटकांना बसल्याचे दिसून आले.

### गोव्याबाबत पर्यटकांचा निरुत्साह

डिसेंबर अखेरीस आणि सणांच्या हंगामात पर्यटक सर्वाधिक गोव्याला पसंती देतात. देश-विदेशातील पर्यटक ख्रिसमस व नव्या वर्षाच्या सेलिब्रेशनसाठी गोव्यात येतात. गोव्यातील समुद्र किनारे, बाजारपेठा, नाइट क्लबमध्ये नव वर्षाचे सेलिब्रेशन करण्यासाठी पर्यटक खास भेट देतात. सध्या



सोशल मीडियावर अनेक फोटो व व्हीडिओ व्हायरल होत आहेत. त्यात गोव्याकडे पर्यटकांनी पाठ फिरवल्याचे म्हटले आहे. सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी गोव्यात पर्यटक आले नसल्याच्या दाव्यांवर व सोशल मीडियावर होत असलेल्या चर्चेवर पर्यटन मंत्र्यांनी म्हटले की, किनारपट्टीवर असलेल्या गोव्याचा पर्यटनाचा हंगाम जबरदस्त असा राहिलाय. फोर स्टार, फाइव्ह स्टार हॉटेल्समध्ये खूप गर्दी आहे. त्यामुळे गोव्यातील बाजारपेठेत मोठी उलाढाल होत आहे. पर्यटन गोव्याच्या अर्थव्यवस्थेचा पाया आहे. यावर लाखो लोकांचा उदरनिर्वाह होतो आणि आम्हा लोकांसाठी अनेक संधी निर्माण होते, असेही गोव्याचे पर्यटन मंत्री म्हणाले.

पर्यटकांची जास्त पसंती ही किनारपट्टी भागास असल्याने किनारपट्टी भागातील रिसॉर्ट, अन्य निवास व्यवस्था फुल्ल झाली आहेत. परिणामी पर्यटकांना लगतच्या गावांमधील निवास व्यवस्थेचा आधार घ्यावा लागत होता. आता मात्र शहरातील निवास व्यवस्थाही फुल्ल झाली आहे. त्यामुळे व्यावसायिकांना चांगले उत्पन्न मिळाले असून, लाखो रुपयांची उलाढाल झाली आहे.

सरत्या वर्षातील पर्यटन हंगामात येथे आलेल्या पर्यटकांना किमती मासळीचा आस्वाद लुटण्यासाठी जादा पैसे मोजावे लागत होते.

# युरोप, अमेरिकेच्या अंतराळ मोहिमेतून इस्रोने कमविले ३६०० कोटी

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

केंद्रीय अंतराळ राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी भारतीय अंतराळ संशोधन संस्था, म्हणजेच इस्रोबाबत मोठा खुलासा केला आहे. जितेंद्र सिंह म्हणाले की, गेल्या दहा वर्षांत इस्रोने युरोप आणि अमेरिकेच्या अंतराळ मोहिमांद्वारे सुमारे ४२७ दशलक्ष डॉलर्स कमावले आहेत. भारतीय रुपयांमध्ये त्याची किंमत सुमारे ३६०० कोटी रुपये होते.

राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी मंगळवारी सांगितले की, इस्रोने गेल्या दहा वर्षांत अमेरिका आणि युरोपियन



युनियनसाठी व्यावसायिक उपग्रहांच्या प्रक्षेपणातून $४२७ मिलियनपेक्षा जास्तची कमाई केली आहे. त्यांनी आगामी काळात महसुलाचे आकडे वाढण्याची शक्यता वर्तवली. तसेच, इस्रो २०२५ च्या पहिल्या सहामाहीत पाच व्यावसायिक प्रक्षेपण करणार असल्याची माहिती दिली.

आतापर्यंत इस्रोने अमेरिकेसाठी उपग्रह प्रक्षेपित करून $१७२ मिलियन कमावले, तर युरोपियन युनियनकडून $३०४ मिलियनची कमाई केली. विशेष म्हणजे, गेल्या दहा वर्षात यूएस प्रक्षेपणातून $१५७ आणि ईयू प्रक्षेपणातून $२७१ मिलियनची कमाई झाली आहे. हे भारताने अंतराळ अर्थव्यवस्थेत केलेली प्रगती आणि एक अग्रगण्य अंतराळ राष्ट्र म्हणून त्याची प्रतिष्ठा दर्शवते. आगामी काळात अशा आणखी मोहीमा राबवण्यात येणार असल्याचे जितेंद्र सिंह यांनी सांगितले.

# बांगलादेश शांती मिशन !

बांगलादेशातील सध्याच्या परिस्थितीबद्दल चिंतित असलेल्या पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सोमवारी केंद्राला संयुक्त राष्ट्रांकडे शेजारच्या देशात शांतता मोहीम तैनात करण्यासाठी आणि छळ झालेल्यांना मदत करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे संपर्क साधण्यास सांगितले. तेथील भारतीयांनी त्याला परत आणण्यासाठी हस्तक्षेप करण्याचे आवाहन केले. परराष्ट्र मंत्र्यांनी बांगलादेशातील सद्यस्थितीबाबत भारताची भूमिका संसदेला अवगत करावी, अशी मागणीही बॅनर्जी यांनी केली. जर हे काम करण्यासाठी पंतप्रधान मोदी स्वत: उपलब्ध नसतील, तर चालू हिवाळी अधिवेशनात परराष्ट्रमंत्र्यांचे वक्तव्य आले पाहिजे. दोन देशांमधील द्विपक्षीय मुद्द्यांवर भाष्य करणे त्यांच्या अधिकार क्षेत्राबाहेर आहे कारण बंगाल हे देशाच्या संघराज्य व्यवस्थेतील एक राज्य आहे. आवश्यक असल्यास, बांगलादेशच्या अंतरिम सरकारशी चर्चा करून सामान्य स्थिती पुनर्संचयित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय शांतता सेना देखील पाठवावी. छळलेल्या भारतीयांची सुटका करून त्यांना सीमेच्या या बाजूला आणून त्यांचे पुनर्वसन करण्याची नितांत गरज आहे. बांगलादेश आणि इतर देशांतील सर्व समुदायांमध्ये सौहार्द, बंधुता आणि सौहार्दपूर्ण संबंध कायम राहावेत, अशी ममता बॅनर्जी यांनी व्यक्त केली आहे. सीमेच्या पलीकडे कायदा आणि सुव्यवस्था ढासळत असतानाही केंद्र सरकार 'गेल्या १० दिवसांपासून गप्प बसले' असा आरोप बॅनर्जी यांनी केला. स्थानिक भाजप नेते त्यांच्या केंद्रीय नेतृत्वाला बांगलादेशातील परिस्थितीत सक्रिय हस्तक्षेप करण्यास का सांगत नाहीत? त्याऐवजी, त्यांचे नेते आमच्या सीमा ओलांडून मालाची वाहतूक थांबवण्याची मागणी करत आहेत. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी बांगलादेशातील अस्थिर परिस्थितीबद्दल केंद्र सरकारकडे संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमेच्या केलेल्या या मागणीवर व्यापक विचार करण्याची गरज आहे, कारण भारताचा शेजारी आणि ऐतिहासिकदृष्ट्या जवळचा मित्रदेश असलेल्या बांगलादेशात सध्या मानवाधिकारांच्या उल्लंघनाच्या घटनांमुळे अस्थिरता निर्माण होत आहे. भारतासाठी हा केवळ शेजारी देशातील संकटाचा मुद्दा नसून त्याचा थेट प्रभाव देशाच्या पूर्व सीमेवरील सुरक्षेवर आणि शरणार्थी समस्येवर होऊ शकतो. त्यामुळे केंद्र सरकारने बांगलादेशातील स्थितीवर बारकाईने लक्ष ठेवत त्या देशातील नागरिकांचे कल्याण, छळग्रस्तांना मदत आणि भारतीयांच्या सुरक्षिततेसाठी ठोस धोरणात्मक भूमिका घेणे अत्यावश्यक आहे. संसदेत परराष्ट्र मंत्रालयाच्या भूमिकेबाबत सविस्तर चर्चा व्हावी, बांगलादेशातील घटनांच्या प्रभावाचे अचूक मूल्यमापन करणे भारताच्या हिताचे ठरेल. बांगलादेशातील संकटावर भारताच्या पुढाकारातून शांती मिशनसारखे पाऊल उचलणे महत्वाचे आहे.

## ये एकदा पुन्हा तू

अवतार आज भीमा,
घे एकदा पुन्हा तू,
ही नाव पैलतीरा,
ने एकदा पुन्हा तू

उरला इथे न आता,
आमचा कुणीच वाली,
होऊन दूत क्रांतीचा,
ये एकदा पुन्हा तू

भांडती तुझ्या नावाने,
हे नेते स्वार्थासाठी तो,
मंत्र आम्हा एकीचा,
दे एकदा पुन्हा तू

नाही कुठेच रूजली,
देशात अजुनी समता,
घे धम्मचक्र हाती,
ते एकदा पुन्हा तू

गांजल्या दु:खी जिवांची,
होऊन आज तू आई,
पदरात लेकरांना घे,
एकदा पुन्हा तू

दाही दिशात सगळा,
अंधार दाटला रे,
घेऊन सूर्य हाती,
ये एकदा पुन्हा तू

- स.ग.पाचपोळ

# चार्टर विमानं का आणि कुणासाठी ?

## नोंद

- मेधा इनामदार

आपल्याकडे केवळ आठ मान्यवर भारतीय उद्योगपतींकडे लांब पल्ल्याची खासगी जेट विमाने आहेत. शाहरुख खान, अमिताभ बच्चन आणि सलमान खानसारखे कलाकार आणि कपिलदेव, सचिन तेंडुलकर, धोनी, कोहली, हार्दिक पंड्या या क्रिकेटवीरांकडेही स्वत:ची विमाने आहेत. आता मात्र अशा सेलिब्रिटींची आणि उद्योगपतींची मक्तेदारी असलेली खाजगी विमाने भाड्याने का होईना, इतरांच्या टप्प्यात आली आहेत.



अतीश्रीमंत लोकांकडे स्वत:चे खाजगी विमान असते हे आपण ऐकलेले असते. कुणी हौशी विवाहेच्छू जोडप्याने आयुष्यभर लक्षात राहील म्हणून विमानात लग्न केले, अशा नवलाईच्या बातम्याही आपण वाचलेल्या असतात. नेहमीच इकॉनॉमी क्लासने लहान आणि अरुंद सीटवर बसून प्रवास करणाऱ्या लोकांच्याही मनात कुठे तरी स्वतंत्रपणे विमानातून रुबाबात प्रवास करायची इच्छा असते. पण डोळे मिटून अशी स्वप्ने पाहणाऱ्यांनो, लक्षात ठेवा, तुम्ही तुमचे स्वप्न पुरे करू शकता. तुम्ही खाजगी विमाने भाड्याने घेऊन वापरू शकता! तुमचे कुटुंब आणि तुम्ही अशा विमान प्रवासाचा आनंद घेऊ शकता. अशा गोष्टी आता खरोखरीच आपल्या हाताशी आल्या आहेत. कधी गरज म्हणून तर कधी हौस म्हणून भाड्याने चार्टर विमान घेणाऱ्या लोकांची संख्या गेल्या काही वर्षांमध्ये लक्षणीयरीत्या वाढली आहे. एका सर्व्हेनुसार कोरोनाच्या महामारीनंतर अशा खाजगी विमानांच्या भाड्यात ४० टक्के वाढ झालेली असूनही चार्टर विमाने बुक करणाऱ्या लोकांच्या संख्येत २० ते ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. तज्ज्ञांच्या मते येत्या तीन वर्षांमध्ये या दरांमध्ये सुमारे चाळीस टक्के वाढीचा अंदाज आहे.

मुळात चार्टर विमानांचा उपयोग भारतासारख्या देशात कसा आणि किती होतो ही समजून घेण्यासारखी बाब आहे. विमान भाड्याने घेण्याची अनेक कारणे असू शकतात. सर्वसामान्य कारणांपैकी एक म्हणजे तुम्हाला गंतव्यस्थानी तातडीने पोहोचणे आवश्यक आहे. कदाचित लांब पल्ल्याचा प्रवास हा करिअरचा एक भाग असेल आणि विमानतळावरील प्रचंड ताण टाळण्याची आवश्यकता असेल तर व्यावसायिकांना स्वत:साठी विमान भाड्याने घेता येणे शक्य आहे. पायलटचा परवाना मिळवायचा असेल तर वैमानिकांना ठराविक तास हवेत लॉग करावे लागतात. त्यासाठी विमान भाड्याने घेणे हा एक चांगला मार्ग ठरतो. परवानाधारक वैमानिकांकडे स्वत:चे विमान नसेल, तर उड्डाणाच्या आनंदासाठी विमान भाड्याने घेता येते. उत्पन्नाचा एक भाग म्हणून इतरांसाठी फ्लाइंग सेवा करण्यासाठीही व्यवसाय म्हणून विमान भाड्याने घेता येते. सिनेमाच्या शूटिंगसाठी विविध प्रकारच्या विमानांची गरज असते, त्यांना या सेवेचा उपयोग होतो. राजकीय व्यक्तींना तातडीच्या कामासाठी प्रवास करण्यासाठी ही सेवा वापरली जाते. निवडणुकीच्या धामधुमीच्या काळात अशा चार्टर विमानांची मागणी फार मोठ्या प्रमाणात वाढते. गुप्ततेची गरज असलेली मोठमोठी व्यावसायिक डील्स अनेकदा अशा खाजगी विमानात होतात.

व्यावसायिक विमान कंपनीतून उड्डाण करण्यापेक्षा खासगी जेट बुक करणे अधिक महागडे आहे, असा अनेकदा विचार केला जातो. तथापि, अशी काही उदाहरणे आहेत, जिथे खाजगी चार्टरद्वारे प्रवास करणे अधिक किफायतशीर आणि फायदेशीर असू शकते. विशेषत:आरोग्यसेवेसाठी याचा उपयोग अत्यावश्यक ठरतो. पेशंटला सुरक्षित आणि तातडीने हलवण्यासाठी चार्टर विमानसेवेचा उपयोग करणे आवश्यक ठरते किंवा देशातल्या एका शहरातील हॉस्पिटलमधून दुसऱ्या शहरातील हॉस्पिटलमध्ये हृदय-किडनी यांच्यासारखे अवयव प्लांट करायचे असतील तर तातडीने पाठवावे लागतात. त्यासाठी वेळेची मर्यादा असते. अशा वेळी या चार्टर विमानसेवेसारखा दुसरा पर्याय आज तरी उपलब्ध नाही.

कनिका टेकरीवाल 'जेट सेट गो' या भारतातल्या पहिल्यावहिल्या भाड्याने विमाने देणाऱ्या कंपनीच्या सहसंस्थापक आणि सीईओ आहेत. 'जेट सेट गो' ही कंपनी सुरुवातीला विमाने असणाऱ्यांकरिता विमान चालवणे, विमानाची देखभाल तसेच ठराविक करारानुसार विमाने भाडेतत्वावर देणे या सेवा पुरवत असे. कंपनीचा विस्तार होत गेला, तसे ते हेलिकॉप्टरसुद्धा भाड्याने पुरवू लागले. सध्या कनिका यांच्याकडे स्वत:च्या मालकीची दहा विमाने आहेत. त्यांची कंपनी क्लाउड आधारित शेड्युलिंग, एअरक्राफ्ट मॅनेजमेंट-सेवा आणि विमान, हेलिकॉप्टरच्या पार्ट्सची सर्व्हिस या सेवा देते. कंपनीच्या वेबसाइटद्वारे खासगी प्रवासी विमान, हेलिकॉप्टर आणि एअर ॲम्ब्युलन्स बुक करू शकतात. बिझनेस ट्रिपपासून वाढदिवसाच्या पार्टीपर्यंत अनेक कार्यक्रमांसाठी जेट किंवा हेलिकॉप्टरची सुविधा पुरवतात.

भाड्याने विमाने पुरवण्याच्या या सेवेत अजूनही काही कंपन्या काम करतात. ताज एयर, ब्ल्युव्हाइट एविएशन, एयर चार्टर सर्विसेस इन इंडिया, एलएफएस,आर्यन एव्हिएशन, पूनावाला एव्हिएशन या कंपन्या खाजगी विमानसेवेच्या व्यवसायात कार्यरत आहेत. त्यांच्याकडून विविध प्रकारची विमाने भाड्याने दिली जातात. साधारणत: पाच ते नऊ प्रवासी बसू शकतील, अशी तीन ते चार प्रकारची टर्बोप्रोप विमाने साधारणपणे दीड ते दोन लाख रुपये प्रती तास भाड्याने दिली जातात. चार ते सहा प्रवासी वाहून नेण्याची क्षमता असलेली हलक्या वजनाची जेट विमाने २.५ ते ३.५ लाख रुपये प्रती तास या दराने भाड्याने दिली जातात. मध्यम आकाराच्या सहा ते दहा लोक बसू शकतात अशा विमानांचे भाडे २.५ ते ४ लाख प्रतीतास असते, तर १२ प्रवासी बसू शकतील अशा सुपर-मिड आकाराच्या विमानांसाठी ३.५ ते दहा लाख रुपयांचे भाडे घेतले जाते. त्यापेक्षाही अधिक मोठ्या विमानांचे भाडे वेळ आणि प्रवाशांची संख्या यावर अवलंबून असते.

ही विमाने अत्यंत आरामदायक आणि आकर्षक असतात. प्रवाशांच्या आवडीप्रमाणे आणि सूचने प्रमाणे विमान कंपनी त्यात विविध प्रकारचे अन्नपदार्थ पुरवते. या विमानांमध्ये आवर्जून क्लायंटच्या आवडीच्या सिनेमा-नाटकांची सोय केली जाते. मेडिकल एयरक्राफ्टमध्ये व्हेंटिलेटर,ऑक्सिजन सिलेंडर आणि इतर आवश्यक सुविधा पुरवल्या जातात. अशा फ्लाइट्सच्या क्रू मेंबर्समध्ये मेडिकल क्षेत्रातील लोकांची व्यवस्था केली जाते. सगळ्यात महत्वाची बाब म्हणजे या विमानातून कोण प्रवास करत आहे ही बाब अत्यंत गुप्त ठेवली जाते. विमानतळावर ठराविक जागा भाड्याने घेणारे फिक्स्ड बेस ऑपरेटर येथून विमान भाड्याने देण्याची तसेच इतर सेवा देतात. फारशी व्यावसायिक हवाई वाहतूक नसलेल्या लहान एअरफील्डवर बहुतेकदा या ऑपरेटर्सची सेवा उपलब्ध असते. तिथून अशा भाड्याच्या विमानांची सेवा पुरवली जाते.

प्रायव्हेट जेटचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पूर्ण प्रायव्हसी मिळते. त्यातून केवळ तुम्ही आणि तुमचा ग्रुप किंवा कुटुंब मिळून प्रवास करत असता. यासाठी तुम्हाला रांगेत उभे रहावे लागत नाही किंवा चेक इन बॅगेज मर्यादेचा त्रास होत नाही. अनेक विमानतळांवर खासगी उड्डाणांचे टर्मिनल वेगळे असतात. त्यामुळे या प्रवासात तुम्ही पाळीव प्राण्यांनाही सोबत घेऊन जाऊ शकता. शॅम्पू, कंडिशनर, लोशन, कोलोन, परफ्यूम, पाण्याच्या बाटल्या, औषधे, आवडती पेये आणण्याची अनुमती अशा प्रकारच्या चार्टर प्लेनमध्ये असते. भाड्याने दिलेली सर्व खाजगी विमाने पेये आणि स्नॅक्स पुरवत असताना, प्रवाशांच्या आवडीच्या कोणत्याही अतिरिक्त केटरिंगची व्यवस्था मागणीप्रमाणे केली जाते. प्रायव्हेट जेटने कुठेही प्रवास करता येतो. एकाच दिवसात अनेक ठिकाणी प्रवास करणेदेखील शक्य होते. महत्वाची बाब म्हणजे अशा फ्लाइटची येण्या-जाण्याची वेळ प्रवासी स्वत: ठरवू शकतो. त्यासाठी केवळ विमानतळ प्रशासनाची परवानगी घ्यावी लागते.

एरवी प्रवास करताना आपल्याला उड्डाणाच्या किमान दोन, तीन तास आधी विमानतळावर पोहोचावे लागते. परंतु चार्टर्ड विमानाने प्रवास केला जातो, तेव्हा इतक्या लवकर विमानतळावर पोहोचावे लागत नाही. बहुतेक सर्व चार्टर्ड प्लेन्समध्ये वायफायची तसेच करमणुकीच्या सुविधादेखील मिळतात. हल्ली अनेक चार्टर्ड प्लेन्समध्ये ओटीटी प्लॅटफॉर्म्सचाही ॲक्सेस दिला जातो. विमान भाड्याने घेणाऱ्या क्लायंटच्या मागणीप्रमाणे या विमानांमध्ये विशेष केअर टेकर देखील असतात. चार्टर प्लेन बुकिंगसाठी त्या त्या कंपन्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन बुकिंग करता येते. आज भारत ही जगातील तिसरी सर्वात मोठी नागरी विमान वाहतूक बाजारपेठ आहे.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# अग्गो बाई ढग्गो बाई

## सृजनशील शिक्षक

● संदिप विष्णु राऊत

सहा.अध्यापक जि.प.म.उ.प्रा.शाळा,
हातणी पं.स.चिखली




यावेळी शाळा उशिरा सुरू झाल्या आणि दुर्दैवाने पाऊस ही उशिरा पडला. सकाळी अतिशय कडकडीत ऊन पडलेलं. मनात म्हटलं आपण आजच डीक्कीत रेनकोट ठेवलेला, पावसाचा जराही अंदाज वाटत नाहीये.

परिपाठ घेताना नव्याने रुजू झालेल्या पहिल्या वर्गाची छान उपस्थिती पाहून आनंद वाटला. अजुनही माहेरी आलेल्या त्या दोन आयांची मुलं दिसली नाही. दुपारी चक्कर मारावी लागणार. पालकांचा व्हॉट्सअप ग्रुप बनवला, पण अर्ध्या अधिक पालकांकडे स्मार्ट फोनच नाही. सगळंच कुठे मनासारखं व्हायला. असो.

वर्गात बालभारती भाग १ पुस्तकात पहिलाच पाठ कवितेचा. आणि चक्क माझ्या अतिशय आवडत्या जोडीची संदीप खरे आणि सलील कुलकर्णी यांचीआवडती कविता. अग्गो बाई! म्हटलं चला सुरुवात यानेच करावी. मुलांना नाचायला, गाणी म्हणायला खूप आवडतं. मला कंबर वाकवून नाचायला खूप वर्ष झालेली. पण म्हटलं जसं जमेल तसं.

**अग्गोबाई ढग्गोबाई लागली कळ**
**ढगाला उन्हाची केवढी झळ**
**थोडी, थोडकी लागली फार**
**डोंगराच्या डोळ्याला पाण्याची धार ।।धृ।।**
**अग्गोबाई...**

कंबरेत वाकून अग्गो बाई म्हणतांना माझा जरा जाडसर आवाज ऐकून मुलं चक्क हसली मला. पण म्हटलं लाजायचं नाही. मग काय धमाल नुसती, मुलांना आवडायला लागली.

**वारा वारा गरागरा सो सो सूम**
**ढोल्या ढोल्या ढगात ढुम ढुम ढुम**
**वीजबाई अशी काही तोऱ्यामधे खडी**
**आकाशाच्या पाठीवर चमचम छडी ।।१।।**
**अग्गोबाई...**

ढोल्या ढोल्या ढगात... म्हणतांना कुठल्या तरी ढोल्या माणसाची नक्कल खूपच आवडली छोट्यांना. ते कडवं मग फेवरेट झालं... ढुम ढुम ढुम करत अशी काही खिदळली की... वर्गात नुसता कल्ला झाला. चमचम छडी हातावर मारताना कमरेचा ठुमका अन जणू काही त्यांच्यात मारकुटे पंतोजी शिरले. खरी धमाल तेव्हा झाली, जेव्हा जोरदार पाऊस सुरू झाला. कुणाला कुणाचा आवाज येईना.... रप रप रप.... पत्राच्या खोल्यात अशावेळी घसा कोकलून काहीही उपयोग नसतो. मग काय, दप्तर बिप्तर गुंडाळून सगळे दाराशी जमा झालो. पावसाच्या काही सरी अंगावर झेलत, जमिनीवर पडणाऱ्या पावसाच्या आवाजाचा, फरशीवर फुटणाऱ्या या फुग्यांच्या गमतीजमतीचा आनंद घेतला. अगदी काहीच वेळात मैदानावर साचलेलं पाणी, वाहणारे गढूळ ओहोळ बघण्याची मजा औरच.

'सर लघवीला सोडा ना' अरे पाऊस किती आहे?

'प्लीज सर जाऊ द्या ना, बरं भिजू नका, आणि पळत सुटू नका' माझं म्हणणं कुणी ऐकेल तर शपथ. सगळ्या बहाद्दरांनी पाण्याच्या डबक्यात उड्या काय मारल्या, पत्राच्या पाण्यात एकमेकांना भिजवलं काय, अर्धवट ओले झालेले त्याचे खोडकर चेहरे पाहून मला काय समजायचं ते समजलं. चक्क मला गंडवून त्यांनी पावसाचा पूर्ण आनंद घेतला.

**खोलखोल जमिनीचे उघडून**
**दार बुडबुड बेडकाची बडबड फार**
**डुंबायला डबक्याचा करूया तलाव**
**साबु-बिबु नको थोडा चिखल लगाव ।।२।।**
**अग्गोबाई...**
**साबु-बिबु नको**
**थोडा चिखल लगाव..... थोडा चिखल लगाव.....**
**आता कविता खऱ्या अर्थानं पूर्ण झाली.**
**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

(जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, बुलढाणा व शिक्षण विभाग जि.प., बुलढाणा)

# गुलामगिरी पद्धत ही बेकायदा

कृष्णकुमार निकोडे

रामनगर, गडचिरोली मोबा- ७७७५०४१०८६.

इच्छेविरुद्ध विकत घेण्यात येत असे किंवा ते जन्मापासूनच गुलाम समजले जात असत. काम सोडून जाण्याचा, कामास नकार देण्याचा किंवा कामासाठी मोबदला मागण्याचा अधिकार त्यांना नसे. काहीं जुन्या गुलामगिरीच्या व्यवस्थांमध्ये मालक गुलामांना ठारही मारू शकत आणि ते कायद्यात बसत होते. इतिहासातील अनेक समाजांनी गुलामगिरीची पद्धत उघडपणे मान्य केली होती. आधुनिक काळात जगभरातील बहुतांश ठिकाणी गुलामगिरी जरी बेकायदा असली, तरीही ती काही स्वरूपात चालू आहेच. उदा: धन्याच्या कर्जात अडकलेले नोकर, घरी कायमस्वरूपी ठेवलेले नोकर, दत्तक घेतलेल्या मुलांचा नोकर म्हणून वापर, मुलांचा सैनिक, क्रांतिकारी वा दहशतवादी म्हणून वापर, जबरदस्तीने केलेले लग्न, कामेच्छेसाठी वापरले जाणारे किंवा पुरविले जाणारे गुलाम आदींचा समावेश होतो. गुलामगिरी माणसाच्या लिखित इतिहासाच्याही पूर्वीपासून अनेक संस्कृतींमध्ये चालू होती. आज जगात उपरोक्त प्रकारच्या गुलामांची संख्या १.२ ते २.७ कोटी असावी, असा अंदाज आहे. मात्र एकंदरीत लोकसंख्येच्या मानाने हे प्रमाण ऐतिहासिक प्रमाणांपेक्षा अत्यल्प मानता येईल. यातील सर्वाधिक संख्या दक्षिण आशियातील कर्जबाजारी झालेल्या नोकरांची आहे. अनेकदा ही गुलामी पिढ्यानपिढ्या चालू राहते. बायका आणि मुलांचे लैंगिक शोषण आणि त्यासाठी त्यांची केली जाणारी आयात-निर्यात हा गुलामगिरीचा एक स्वतंत्र भागच आहे.

औद्योगीकरणाच्या आधी गुलाम आणि त्यांची श्रमशक्ती यांना आर्थिक दृष्टीने मोठेच महत्त्व होते. यंत्रयुगात मानवी श्रमांचे आर्थिक महत्त्व कमी होत चालले आहे. नोरबेर्त विनर म्हणतात, "यंत्र शक्तीमध्ये मानवी श्रमांचे आर्थिक मूल्य आहे, पण गुलामगिरीत जी क्रूरता असते ती नाही." १९ व्या शतकाच्या सुरुवातीस गुलाम व भूदास ह्यांची संख्या लोकसंख्येच्या तीन चतुर्थांश होती. यंत्रयुगात प्रचंड प्रमाणावर मजूर लागत नाहीत त्यामुळे गुलामीचे आर्थिक महत्त्व निघून गेले आहे. गुलामी मात्र आर्थिक कारणांसाठी नाही तर मानवी हक्क म्हणून बेकायदेशीर केली गेली.

गुलाम हा मूळ अरबी भाषेतील शब्द असून त्याचा अर्थ सेवक असा होतो. नंतर तो बहुधा मध्ययुगीन काळात उर्दू व अन्य भारतीय भाषांमध्ये आला असावा, असा अंदाज बांधला जातो. संस्कृत भाषेत मात्र हा शब्द आढळत नाही, हे उल्लेखनीयच!

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# 'ग़म का ख़ज़ाना तेरा भी है मेरा भी...'

## सदाबहार

● संदिप विष्णु राऊत

ईमेल - raaut.sandip@gmail.com

**ग़म का ख़ज़ाना तेरा भी**
**है मेरा भी ये नज़राना तेरा भी**
**है मेरा भी अपने ग़म को गीत बना कर गा लेना**
**राग पुराना तेरा भी है मेरा भी "**

गझल गायनाचा अनभिषिक्त सम्राट जगजीत सिंग आणि भारतरत्न गान सम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या तलम सुरावटीतून हे गीत ऐकताना आपण भारावून गेलो नाही असं होणं शक्यच नाही. कधी कधी सुरावट थबकून ठेवते, कधी कधी त्यातला अर्थ बांधून ठेवतो.

दु:खाचा खजिना तुझाही आणि माझाही आहे, हा नजराणा तुझाही तसाच माझाही आहे. आपल्या दु:खांचे गीत बनवून गायलं पाहिजे, नुसता विलाप काय कामाचा? हा दु:खाचा राग प्राचीन आहे, त्यावरील तोडगाही तितकाच जुना...

७० आणि ८० च्या दशकात गायिका पत्नी चित्रा सिंह यांच्यासमवेत जगजीत यांनी केलेल्या गझलांच्या संगीत ध्वनिमुद्रिका प्रचंड लोकप्रिय ठरल्या. त्यांना गझलसम्राट या नावाने ओळखले जाऊ लागले. पंजाबी, हिंदी, उर्दू, बंगाली, गुजराती, सिंधी आणि नेपाळी या भाषांमधून जगजीतसिंह यांनी गायन केले. त्यांना केंद्र शासनाने पद्मभूषण पुरस्काराने गौरवले. पुढे तारुण्यात त्यांचा १८ वर्षांचा मुलगा विवेकचा अपघातात मृत्यू झाला. हा आघात जगजितसिंग आणि चित्रा यांच्या सहनशक्तीपलीकडचा होता. कारण विवेक अशा ठिकाणी गेला, जिथून तो परत कधीच येणार नव्हता. चित्रा यांनी तर गायनच सोडले होते. जगजीत सिंग यांनी अखेरपर्यंत आपल्या सुरांची मोहिनी संगीत जगतावर कायम ठेवली. आज आपल्यात ते नाहीत, पण सुरांच्या रुपात अजरामर आहेत.

**"कौन है अपना कौन पराया क्या सोचें**
**छोड़ ज़माना तेरा भी है मेरा भी**
**शहर में गलियों गलियों जिस का चर्चा है**
**वो अफ़्साना तेरा भी है मेरा भी "**

या ओळी कुणाला आपल्या स्वत:च्या वाटणार नाही? म्हटलं तर वैयक्तिक पातळीवर हे गीत आपल्याला भावनिक दृष्ट्या जोडतं, म्हटलं तर ते वैश्विक पातळीवर सुद्धा जोडतं. आपले काय परके काय, कृष्णाला जसा कुरुक्षेत्रावर हा प्रश्न पडला, तसाच तो आपल्याला ही कुठे पडत नाही? ज्या किस्स्याची/ कहाणीची चर्चा साऱ्या शहरात गल्लोगल्ली होतेय, जी नेहमीच जग करत राहतं, तो तुझाही आणि माझाही नाही का किस्सा?

हे गीत दु:खाच्या सार्वत्रिक अनुभवाबद्दल बोलतं. ते सांगतं की दु:ख हे फक्त एका व्यक्तीपुरतं मर्यादित नसतं, तर ते सर्वत्र आढळतं. आपण आपल्या दु:खाला गीत बनवून व्यक्त करू शकतो आणि त्यातून सांत्वन मिळवू शकतो. हे गीत आपल्याला एकमेकांशी जोडतं आणि आपल्याला समजावून देतं की आपण एकटे नाही. यातील सगळीच कडवी, सगळेच शेर अर्थाच्या अंगाने दमदार आहेतच, पण यातला मला आवडलेला कमालीचा शेर म्हणजे




मय-ख़ाने की बात न कर वाइज़ मुझ से आना जाना तेरा भी है मेरा भी

"वाइज़" म्हणजे धर्मोपदेशक किंवा उपदेश करणारा. माझ्या उणेपणा बद्दल, माझ्या अवगुणांबद्दल, तथाकथित नीतीनियम याबद्दल बोलण्याचा व्यक्ती म्हणून कुणालाच अधिकार नाही, कारण इथे जाणारा तू ही आहे आणि मी ही. यातला सरळ वाच्यार्थ काढला तर मयखाना (दारूचे जिथे विकत मिळते) सरळ अर्थ जरी होत असला, तरी हा अधिक गहिरा जाणारा अर्थ इथे आहे. हे आयुष्य जर मयखाना मानला तर इथे जन्म मृत्यूचा फेरा कुणाचा टळला आहे. आज मला तर उद्या तुलाही जायचं आहेच की नाही?

या गीताला जितका वेळा ऐकलं तितके वेळा अर्थाचे नवे नवे पदर उलगडत जातात. साहित्यिक लिहिताना ज्या अर्थाने अपेक्षेने लिहितो, त्यापेक्षाही ऐकणारा, वाचणारा ज्या दृष्टीने त्याकडे बघतो, तसे अर्थ उलगडत जातात. या अर्थाने या गीताचा अनुवाद करता येत नाही, तो आपला आपला अर्थच अधिक महत्त्वाचा नाही का? आपल्याला कोणत्या अर्थाने ते उलगडले?

**तू मुझ को और मैं तुझ को समझाऊँ क्या**
**दिल दीवाना तेरा भी है मेरा भीजैसा भी**
**है 'शाहिद' को अब क्या कहिए**
**यार पुराना तेरा भी है मेरा भी**

प्रेमाच्या या गोड विळख्यात तू आणि मी दोघेही आकंठ बुडालेले असताना, खरंच आता कोण कुणाला समजावून सांगणार आहे? जसा आहे मी तसाच स्वीकार मला, जुन्या मित्राचा गुण काय अवगुण काय सगळं क्षम्य असतं ना? हे वाक्य साथीदाराला सुद्धा तेवढंच लागू होत नाही का? आपले नाव शेरात अचूक गुंफत शाहिद कबीर यांनी ते अजरामर केले आहे.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# चलती नव्वदीतल्या फॅशनची

मुलांच्या फॅशनविश्वात नव्वदीच्या फॅशनने पुनरागमन केल्याचं दिसून येत आहे. त्या दशकात बॅगी जीन्स आणि सैल टी शर्ट घालण्याचा ट्रेंड होता. तो आता परतला आहे. नव्वदीच्या दशकात बंदाना ही पुरुषांची लोकप्रिय अॅक्सेसरी होती. चित्रपटांमधले हिरो गळ्यात बंदाना घालून मिरवायचे. हाच बंदाना परतला आहे. क्लासी लूक मिळवण्यासाठी मुलं बंदाना कॅरी करत आहेत. कार्गो पँट्स हा प्रकारही नव्वदीच्या दशकात चांगलाच गाजला होता. त्यावेळी या पँट बॅगी आणि सैल होत्या. मात्र आजच्या आधुनिक काळात स्लीम फिटच्या कार्गो पँट्सना पसंती मिळत आहे. या पँट्स क्लासिक शर्ट किंवा सैल टी शर्टसोबत घातल्या जात आहेत. आधी म्हटल्याप्रमाणे बॅगी जीन्स हा प्रकारही इन आहे. अत्यंत आरामदायी अशा या पँट्ससोबत सैलसर टी शर्ट घालता येतो. या जीन्सवर सैल जॅकेट किंवा कार्डिगॅनही घालता येतं.



बंदानाप्रमाणेच बकेट हॅटचंही पुनरागमन झालेलं आहे. नव्वदीच्या दशकात बऱ्याच अभिनेत्यांचा डोक्यावर ही बकेट हॅट सजली होती. हीच फॅशन परतली असून जागोजागी बकेट हॅट बघायला मिळत आहेत.

**फॅशन पॅशन**

पेहरावाच्या रंगानुसार बकेट हॅटची निवड करता येते. नव्वदीच्या दशकातल्या तरुणांमध्ये ग्राफिक टी शर्टचं प्रचंड वेड होतं. अशा पद्धतीचे टी शर्ट पुन्हा फॅशनविश्वाचा भाग झाले आहेत. ग्राफिक टी शर्ट प्लेन जीन्सवर घालता येईल. प्रत्यक्षात ग्राफिक टी शर्ट हा प्रकारच क्लासी आहे. त्यामुळे प्लेन बॉटमवर असा टी शर्ट अगदी सहज कॅरी करता येईल.



**आजच्या स्वतंत्रपणे व्यवसाय सुरू करण्याच्या काळामध्ये अनेक तरूण वडिलोपार्जित व्यवसाय पुढे नेण्याचे ध्येय ठेवतात. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत नोकरी करायची नाही, स्वतःचा उद्योगच करायचा, असा निश्चय संदीपने अगदी आरंभापासूनच केला होता. त्यांचे वडील श्रीकांत पवार हे सोलापूरचे जाणते कलावंत. सार्वजनिक मंडळांच्या मूर्तींना रंग देण्यापासून विविध घरांचे इंटिरियर करण्यापर्यंत अनेक कामे त्यांनी केली.**

# जादूचे हात असणारा संदीप

लहानपणापासूनच वडिलांचे काम संदीप पाहत होते. त्यामुळे कलेची पदवी घेतल्यानंतर पूर्णवेळ याच उद्योगात त्यांनी नशीब आजमावून पाहण्याचे ठरवले. कलेच्या निसर्गदत्त देणगीमुळे अल्पावधीतच संदीप यांचा लौकिक वाढू लागला आणि अगदी तरूण वयात केवळ शिल्पकला, म्युरल, अर्धपुतळे (बस्ट) अशी खूप कामे ते करायला लागले. वर्षाला लाखो रुपयांची उलाढाल ते करतात. सोलापुरातील त्यांचा कला स्टुडिओ प्रेक्षणीय आहे.

कोणतेही शिल्प करताना कलावंत म्हणून संदीपचे तारतम्य असतेच. पण शिल्पाची उंची, ठेवण आणि त्याचे हावभाव हे महत्त्वाचे घटक असतात. मागच्या काही वर्षांमध्ये संदीपने अनेक शिल्प केली आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, अक्कलकोटचे स्वामी समर्थ, शिर्डीचे साईबाबा, श्री शंकरलिंग महाराज, पंढरीचा विठुराया, गिरिधर गोपाल, खो-खो खेळणारी मुले, फिल्म, स्वमग्न सुंदरी, श्रीगणेश ही शिल्प देशविदेशात विक्री झाली आहेत. सोलापुरातील 'प्रिसिजन कॅमशाफ्ट' कंपनीचे यतीन शहा यांनी तर गणपती बाप्पांची अनेक शिल्पं संदीपकडून खरेदी केली आहेत. 'प्रिसिजन' संगीत महोत्सवात, त्याचप्रमाणे कंपनीला भेट देणाऱ्या देश-विदेशातील मान्यवर पाहुण्यांना ते हीच भेट देतात. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना श्री. शहा यांनी श्रीगणेशाचे शिल्प दिल्यावर ते खूपच प्रभावित झाले. अभिनेते सोनू सूद यांना 'हात उंचावलेले साईबाबा' भेट देण्यात आले, तेव्हा त्यांनी आवर्जून शिल्पकार कोण आहे ते जाणून घेतले. तर उपमु'यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केदार शिंदे यांनी 'हात उंचावलेले अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ' भेट दिले, तेव्हा त्यांना ते शिल्प खूपच आवडले. आदेश बांदेकर यांनी त्यांच्या आईचे शिल्प संदीपकडून करवून घेतले. काँग्रेसचे सोलापूर जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहितेपाटील यांनी त्यांचे वडील प्रतापसिंह मोहितेपाटील यांचे अश्वारुढ शिल्प करून घेतले. 'प्राईड ऑफ सोलापूर' हे अत्यंत सुरेख असे म्युरल संदीप यांनी तयार केले. त्यात पंढरीचा

**अचिव्हर**

विठु राया, माळढोक पक्षी, श्रीस्वामी समर्थ, ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर आणि त्यांचे नंदिध्वज, श्री तुळजाभवानी, सोलापूरचे हुतात्मे, एनटीपीसी प्रकल्प, उजनी धरण आणि सोलापूरचा भूईकोट किल्ला या सगळ्याचा समावेश आहे. मुंबईत झालेल्या संदीपच्या शिल्पप्रदर्शनास अनेक मान्यवरांनी हजेरी लावली, शिल्प खरेदी केली. संदीप यांनी शिल्पांबरोबरच अनेक म्युरल्स तयार केली आहेत. उजनी धरणावरील विश्रामगृहाप्रमाणेच इतर अनेक ठिकाणी त्यांची म्युरल्स संबंधित ठिकाणाची शोभा वाढवत आहेत. वनमाळी श्रीकृष्ण, कलश अशी अनेक उत्तमोत्तम म्युरल्स त्यांनी मागणीनुसार केली आहेत.

शिल्पनिर्मिती ही खूप कठीण गोष्ट आहे. कारण एका साच्यातून काढावयाची ती गोष्ट नव्हे. वेगवेगळ्या शिल्पांचे भाव पकडण्यासाठी शिल्पकाराला पूर्ण एकाग्र व्हावे लागते. काम करताना संदीप यांची समाधी लागलेली असते. शिल्पांची विक्री किंवा खरेदीचा कोणताही बाजार नसतो. मागणीनुसार पुरवठा या न्यायाने हे काम केले जाते. अर्थात संदीप यांचे कलावैभव मोठे असल्याने त्यांच्याकडून नवनव्या शिल्पांची सतत मागणी असते. 'साचेबद्ध' काम करत नसल्याने त्यांना मेहनत घ्यावीच लागते. सोलापुरात स्टुडिओ असला तरी अलीकडच्या काळात 'ऑनलाईन' माध्यम फारच महत्त्वाचे आणि उपयुक्त ठरत आहे. बऱ्याचदा संदीप यांना शिल्पांची 'ऑनलाईन' मागणी होते. 'मार्केटिंग'साठी वेगळा वेळ देणे संदीपना शक्य होत नाही, कारण 'वर्कलोड' जास्त असते. पण मौखिक 'पब्लिसिटी' आणि गुणवत्ता यामुळे संदीप यांना दिवसाचे २४ तासही कमी पडत आहेत. वारसा हक्काने मिळालेल्या कलेची योग्य जोपासना करून तेच चरितार्थाचे साधन बनवणाऱ्या संदीप पवार यांची यशोगाथा तरुणाईला निश्चितच प्रेरणादायी आहे, यात शंका नाही




## शेर की जुबानी

शिकायत है उन्हें कि हमें,
मोहब्बत करना नहीं आता,
शिकवा तो इस दिल को भी है,
पर इसे शिकायत करना नहीं आता।

यादों में ना ढूंढो हमें,
हम दिल में बस जाएंगे,
तमन्ना हो अगर मिलने कि
तो ऑन करो मोबाईल हम
इनबॉक्स में मिल जाऐंगे।

हजार बार ली है तुमने तलाशी मेरे दिल कि,
बताओ कभी कुछ मिला है इसमें, प्यार के सिवा।

**स्मार्ट टिप्स**

## कनेक्ट युवर वायरलेस हेडफोन



सध्या अनेक जण वायरलेस हेडफोन्स वापरतात. हे हेडफोन्स स्मार्टफोनला कनेक्ट होतात. त्याचप्रमाणे ते लॅपटॉप किंवा पीसीलाही कनेक्ट करता येतील. यासाठी हेडफोन्स तसंच पीसी किंवा लॅपटॉप ऑन करा. यानंतर ब्लूटूथ हेडफोनचा पेअरिंग मोड सुरू करा. यानंतर विंडोजच्या सेटिंग्जमध्ये जा. इथल्या सर्च बॉक्समध्ये कंट्रोल पॅनल सर्च करा. कंट्रोल पॅनलमध्ये अॅड डिव्हाइस हा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक केल्यानंतर ब्लू टूथ हेडफोन हा पर्याय दिसेल तिथे क्लिक करा. यानंतर तुमचा वायरलेस हेडफोन पीसी किंवा लॅपटॉपला कनेक्ट होईल.

**स्मार्ट ट्रिक्स**


## मोफत वायफाय सेवा वापरताना...




विमानतळ किंवा अन्य ठिकाणी मोफत वायफायची सेवा उपलब्ध असते. मात्र या वायफायचा वापर करणं धोक्याचं ठरू शकतं. तुम्ही हॅकर्सच्या जाळ्यात अडकू शकता. मात्र तुम्ही मोफत वायफाय सेवेचा वापर सुरक्षित पद्धतीने करू शकता. यासाठी मोबाईलच्या सेटिंग्जमध्ये जा. मग वायफायवर क्लिक करा. यानंतर खालच्या बाजूला स्क्रॉल करून अॅडव्हान्स सेटिंग्जमध्ये जा. इथे स्कॅनिंग ऑलवेज एव्हलेबल हा पर्याय दिसेल. हे फीचर सुरू करा. यामुळे वायफायचा वापर करताना स्कॅनिंग होईल आणि तुमचा फोनही सुरक्षित राहील.

**वेबवर्ल्ड**

## वेबसाईट बनवताय?




कोणत्याही वेबसाईटला भेट दिल्यानंतर 'अबाउट अस' या पर्यायाचा शोध घेणारे अनेक जण असतात. या पेजवर संबंधित कंपनीची माहिती दिलेली असते. पण यात झालेल्या काही चुका चांगल्याच महागात पडू शकतात. तुम्हीही स्वतःची वेबसाईट तयार करत असाल काही गोष्टी टाळायला हव्यात. 'अबाउट अस' या पेजवर आपला पत्ता, संपर्काचा क्रमांक तसंच कामाच्या वेळ नोंदवायला हवी. तुमचं पेज रंजक असायला हवं. इतकंच नाही तर आपला व्यवसाय किंवा उपक्रमाची सविस्तर माहितीही द्यायला हवी.

**टेक ज्ञान**

## डिलिट गूगल मीट फ्रॉम जी मेल




गूगलने जीमेल सेवेसोबत गूगल मीट जोडण्याचा निर्णय घेतल्यामुळे तुमच्या जीमेल अकाउंटमध्ये हा पर्याय दिसू लागला आहे. मात्र अनेकांना जी मेलमध्ये मीटचा ऑप्शन नको आहे. हा ऑप्शन डिलिट करता येईल. यासाठी जी मेल ओपन करून तीन टिंबांवर क्लिक करा. तुम्हाला सेटिंग पर्याय दिसेल. यानंतर गूगल अकाउंटवर क्लिक करा. खालच्या बाजूला स्क्रॉल केल्यानंतर गूगल चॅट आणि मीटचा पर्याय दिसेल. मग हे दोन्ही पर्याय बंद करा. ही कृती केल्यानंतर जीमेलमधला मीट पर्याय डिलिट होईल.

# सेल्फ रिस्पेक्ट महत्त्वाचा!

व्यक्तिमत्व विकास हा आजकालचा झालेला महत्वाचा विषय आहे. व्यक्तिमत्व विकास करताना स्वतःचा आत्मविश्वास आणि स्वतःबद्दल वाटणारं प्रेम कसे वाढवायचे याकडे लक्ष देणे महत्त्वाचे ठरते.

गरजेपेक्षा जास्त बोलणे टाळा : आपलं बोलणं गरजेचे नसेल तिथे बोलणं टाळा. जास्त बोलत राहिल्याने समोरच्या व्यक्तीची चिडचिड होऊ शकते. कुणालाही खूप जास्त बोलणारे लोक नको असतात. अशा लोकांना इतर लोक टाळायला लागतात आणि त्यांचा कोणीही आदर करत नाही.



स्वतःवर जास्त मेहनत करा, स्वतःला जास्त वेळ द्या : व्यक्तिमत्व घडवण्यासाठी स्वतःवर काम करा. अधिक चांगले व्यक्तिमत्त्व बनवण्यासाठी नियमित व्यायाम करा. स्वतःसाठी वेळ काढा. आपल्याला आवडेल असे काही करा त्यातून आपल्याला मानसिक समाधान मिळते आणि आपले काम करायला उत्साह येतो.

**ग्रुमिंग**


कुणाविषयी सीिंळ किरणे टाळा : आपल्याला सवय असते इतरांविषयी काही ना काही बोलायची परंतु हि सवय चांगली नाही असे केल्याने आपण आपल्यातला कमी पण लपवण्यासाठी इतरांच्या चुका दाखवण्यासारखे आहे.

आपण कसे राहतो यावर लक्ष द्या : आपण कसे राहतो याकडेही लक्ष द्यायला हवे, आपली पहिली छाप ही आपण कसे राहतो? कसे कपडे घालतो? यावर अवलंबून असते.

आपल्या कामात स्वतःला व्यस्त ठेवा : एखादी गोष्ट खरच चांगली असेल तर ती मिळवण्याची जिद्द बाळगा. आपल्या कामात स्वतःला व्यक्त ठेवा. त्यामुळे आपल्याला हवी असलेली गोष्ट मिळवण्यासाठी आपण कुठेही कमी पडणार नाही.

स्वतःवर वेळ खर्च करायला शिका : स्वतःवर खर्च करा याचा अर्थ असा कि आपणच आपला आदर केला नाही तर दुसरे कशाला करतील. त्यामुळे स्वतःवर वेळ खर्च करा म्हणजे दुसरेही तुमचा विचार करतील आणि तुमच्यासाठी आवर्जून वेळ काढतील. या मुळे चारचौघामध्ये आपण चांगल्या पद्धतीने वावरू शकतो.

# आंतरराष्ट्रीय व्यापारातल्या करिअर संधी



'इंटरनॅशनल बिझनेस ऑपरेशन्स' या विषयात सध्या बऱ्याच संधी निर्माण झाल्या आहेत. या अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना विविध देशांमधल्या अर्थव्यवस्थेची ओळख करून दिली जाते. यासोबतच सध्याच्या औद्योगिक परिस्थितीत विविध अर्थव्यवस्थांच्या आपसातील संबंधांबाबतही विद्यार्थ्यांना सजग केलं जातं. हा अभ्यासक्रम पूर्ण करून विद्यार्थी 'इंटरनॅशनल बिझनेस' या क्षेत्रात उत्तम करिअर करू शकतात. एक इंटरनॅशनल बिझनेस मॅनेजर आपल्या कंपनीच्या प्रगतीसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर धोरणात्मक व्यावसायिक योजना तयार करतो. आंतरराष्ट्रीय व्यापाराशी संबंधित समस्या ओळखून त्या सोडवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करतो.

आंतरराष्ट्रीय व्यापार या विषयात डिप्लोमापासून अगदी पीएचडीपर्यंत शिक्षण घेता येतं. इंटरनॅशनल बिझनेसमध्ये एमबीए केल्यानंतर तुम्ही एक्सपोर्ट मॅनेजर आणि एक्सिक्युटिव्ह, ग्लोबल बिझनेस मॅनेजर, इंटरनॅशनल बिझनेस डेव्हलपमेंट मॅनेजर,

**वेगळ्या वाटा**

इंटरनॅशनल फायनान्स मॅनेजर, इंटरनॅशनल ब्रँड मॅनेजर अशा पदांवर काम करू शकता. या अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी प्रवेश परीक्षांना सामोरं जावं लागतं. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर मात्र संधींची कवाडं खुली होतात. आंतरराष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये उच्च पदावर काम करायची संधी मिळते. त्यामुळे उद्योग, व्यवसाय, आंतरराष्ट्रीय व्यापार अशा विषयांची आवड असणारे विद्यार्थी 'इंटरनॅशनल बिझनेस ऑपरेशन्स' हा विषय निवडू शकतात.

# सूर जुळतील का?

मी २८ वर्षांचा तरुण असून सहा महिन्यांनी माझं लग्न होणार आहे. माझं अरेंज मॅरेज आहे. दिवसभरात दोन ते तीन वेळा आम्ही फोनवर बोलतो. माझी होणारी बायको कधी प्रेमळ संवाद साधते तर कधी पुरती गोंधळलेली वाटते. तिला माझ्याशी बोलण्यात रस नाही, असं मला वाटतं. कुटुंबासोबत असताना ती माझ्याशी खूप गोड वागते. पण मित्रमैत्रिणींसमोर तिचं वागणं पूर्णपणे बदललेलं असतं. ती तिच्या मित्रमैत्रिणींना जास्त प्राधान्य देते. यावरून आमची बरीच भांडणंही झाली आहेत. मित्रमैत्रिणींना भेटण्यासाठी तिने आमची भेटही रद्द केली. आमचं लग्न सहा

**मॅच मेकिंग**

महिन्यांवर आलं आहे. पण आमचे सूर काही जुळलेले नाहीत. हे लग्न मी मोडू का? मला मार्गदर्शन करा.



उत्तर : मित्रा, संवादाने अनेक प्रश्न सुटतात. तू तुझ्या होणाऱ्या बायकोशी मोकळेपणाने संवाद साध. तुला खटकणाऱ्या गोष्टी तिच्यापुढे मांड. तुम्ही ठरवून लग्न करताय. त्यामुळे तुला तिचे काही गुण आवडले असतीलच. या गुणांबद्दल विचार कर. लग्न करणं सोपं आहे. पण ते टिकवून ठेवणं खूपच कठीण आहे. त्यामुळे तुमचे स्वभाव जुळायला हवेत. तुम्ही एकमेकांना समजून घ्यायला हवं. तिच्याशी बोलल्याने प्रश्न सुटले नाहीत तर समुपदेशकांची मदत घे.

ट्रेकिंगची आवड असेल तर तुम्ही कक्काबेला जाऊ शकता. कक्काबे हे ठिकाण बंगळूरूपासून २७० किलोमीटर अंतरावर आहे. म्हैसूरपासून रेल्वेस्थानकावर उतरून कक्काबेला जाता येईल. म्हैसूर ते कक्काबेदरम्यान बस बऱ्याच बस धावतात. कक्काबे हे छोटंसं गाव आहे. पावसाळ्यात या गावाचं सौंदर्य खुललेलं असतं. नजर जाईल तिथे फक्त हिरवळ असते. इथल्या डोंगरांवरून कुर्ग तसंच आसपासच्या परिसराचं मनोहारी दृश्य दिसतं.

# नितांत सुंदर कक्काबे



**भटकंती**

कर्नाटकमधलं थंड हवेचं ठिकाण असल्यामुळे कक्काबेमधलं वातावरण आल्हाददायक असतं. या गावाचं अजून एक वैशिष्ट्य आहे. इथे दक्षिण-पूर्व आशियातल्या सर्वात मधुर अशा मधाची निर्मिती होते. या गावात कॉफीचे मळेही आहेत. पश्चिम घाटात वसलेल्या कक्काबे परिसरात विविध प्राणी आणि पक्षी पहायला मिळतात.

कक्काबेमध्ये पर्यटकांची फारशी वर्दळ नसते. त्यामुळे इथला निसर्ग अजूनही टिकून आहे. या गावात भातशेतीही पहायला मिळते. भाताच्या शेतांमध्ये तुम्ही मनसोक्त हिंडू शकता. कक्काबेमध्ये काही दिवस निवांत घालवता येतील.



# लज्जतदार मेयोनीज सँडविच

मित्रांनो, संध्याकाळी खाण्यासाठी मस्तपैकी व्हेज मेयोनीज सँडविच तयार करता येईल. झटपट होणारं हे सँडविच तुम्हाला नक्कीच आवडेल.

**सामग्री:** आठ ब्रेड स्लाईस, चार ते पाच चमचे मेयोनीज, बारीक चिरलेले दोन कांदे, बारीक चिरलेली सिमला मिरची अर्धा कप, किसलेलं गाजर पाव कप, अर्धा टी स्पून मिरपूड, चार टी स्पून हिरवी चटणी, चमचाभर लाल तिखट, दोन टी स्पून बटर, चवीनुसार मीठ.

**झटपट रेसिपी**

**कृती:** एका भांड्यात सर्व भाज्या घाला. त्यात मेयोनीज, मीठ, लाल तिखट, मिरपूड घालून नीट मिसळून घ्या. आता दोन ब्रेड स्लाईस घ्या. ब्रेडच्या या दोन्ही स्लाईसवर हिरवी चटणी लावून घ्या. एका स्लाईसवर भाज्यांचं मिश्रण पसरा. त्यावर दुसरा ब्रेड ठेवा. तव्यावर थोडं बटर घाला. आता हे सँडविच तव्यावर ठेवा. दोन्ही ब्रेड नीट भाजून घ्या. एका प्लेटमध्ये काढा. या सँडविचचे दोन त्रिकोणी तुकडे करा. चटणी आणि सॉससोबत खा.

## ऊस दर जाहीर न झाल्यास ऊस वाहतूक रोखणार : शेतकरी संघटना आक्रमक

**शेवगाव :** गेल्या दीड महिन्यापासून ऊस गळीत हंगाम चालू होऊनही अद्याप तालुक्यातील कोणत्याही साखर कारखान्याने ऊस दर जाहीर केला नाही. सर्व ऊस उत्पादक शेतकरी ऊस भावाच्या प्रतीक्षेत आहेत. स्वाभिमानी शेतकरी संघटना विधानसभेची आचारसंहिता उठल्यापासून ऊस दराच्या मागणीसाठी प्रयत्न करत आहे. तहसीलदार ,प्रादेशिक सह संचालक जिल्हाधिकारी , कारखानदार यांच्यासोबत बैठका घेऊन सुद्धा ऊस दराचा तिढा सुटला नाही. यामुळे सर्व शेतकरी व स्वाभिमान शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते संतप्त आहेत. याच भावनेतून आज स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदारांना निवेदन देऊन नवीन वर्षाच्या शुभ मुहूर्तावर गुरुवार दि.२ जानेवारी रोजी एक दिवसाचे लक्षणीक उपोषण करणार आहे. जे कारखानदार ३१०० रुपये भाव देणार नाहीत त्या कारखान्याची शुक्रवार दिनांक ३ जानेवारीपासून तोडणी बंद करून वाहने आडविण्यात येतील .असा इशारा कार्यकर्तांनी दिला आहे. यावेळी ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या व संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या भावना तीव्र होत्या यावेळी उपस्थित स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष रावसाहेब लवांडे, जिल्हा .उपाध्यक्ष दत्ता फुंदे, सरचिटणीस बाळासाहेब फटांगडे, ,तालुका अध्यक्ष अशोक भोसले प्रशांत भराट , पाथर्डी तालुका अध्यक्ष बाळासाहेब गर्जे , अमोल देवढे , हरिभाऊ कबाडी ,दादासाहेब पाचरणे, विकास साबळे , नानासाहेब कातकडे नारायण पायघन,अंबादास भागवत, माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष विनोद शेळके ,उपाध्यक्ष शिवाजी बडे मेजर आदी उपस्थित होते

# टोल नाक्याविरोधात प्रांत कार्यालयावर मोर्चा

◆ **संगमनेर (प्रतिनिधी):**

तालुक्यातील नाशिक - पुणे राष्ट्रीय महामार्ग असलेल्या हिवरगाव पावसा टोल नाक्यावर भारतीय जनता पक्षाचे माजी नगराध्यक्ष यांचे दोन्ही मुले अतुल व अमित यासह तिघांना मारहाण झाल्याची घटना रविवारी मध्यरात्री घडली होती. यामध्ये टोल नाका कर्मचाऱ्यांनी बेदम मारहाण केल्याने तिघेही गंभीर जखमी झाल्याने खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. टोलनाका कर्मचाऱ्यांची सतत होणारी दादागिरी विरोधात संगमनेर शहरातल्या मोर्चा काढत उपविभागीय कार्यालय प्रांगणात जाऊन केले. यावेळी टोलनाका प्रशासनाचा तीव्र निषेध करण्यात आला. या प्रसंगी आमदार अमोल खताळ पाटील आणि नाशिक पदवीधर मतदार संघाचे आमदार सत्यजित तांबे यांनी देखील झालेल्या घटनेचा जाहीर निषेध केला.

झालेल्या प्रकरणाचा निषेध करण्यासाठी मंगळवारी (दि ३१) सकाळी संगमनेर शहरातील सर्व व्यापार्यांनी प्रांत कार्यालयावर मोर्चा नेत निषेध नोंदवला.यावेळी संगमनेर विधानसभेचे आ.अमोल खताळ पाटील, नाशिक पदवीधर मतदार संघाचे आमदार सत्यजित तांबे, दुर्गा तांबे, मनीष मालपाणी यांच्यासह शहरातील सर्व व्यापारी या आंदोलनात सहभागी झाले



होते. यावेळी सर्वांनी तीव्र शब्दात झालेल्या घटनेचा निषेध नोंदवला. याप्रसंगी आ.अमोल खताळ यांनी सांगितलं की,दोन दिवसात राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांना संगमनेरमध्ये बोलावले आहे. अनेक वर्षांपासून टोल नाक्याच्या कर्मचाऱ्यांची दादागिरी सुरु असून हि दडपशाही कुणाच्या आशीर्वादाने सुरु आहे हे तपासण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. ते कर्मचारी कुणाचे कार्यकर्ते आहेत. या गुंडांचा म्होरक्या कोण आहे हे शोधण गरजेचे आहे.

स्थानिक नागरिकांना सवलत असताना देखील त्यांच्याकडून जबरदस्ती टोल वसूल करण्यात येतो. हे पण थांबले पाहिजे. झालेल्या

### दोन्ही आमदारांची उपस्थिती

घटने बाबत जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल होणे गरजेचे आहे. हा गुन्हा दाखल करणार असल्याचे अधिकाऱ्यांनी आश्वासित केले आहे. माझ्या मतदार संघातील कुणावरही अन्याय झाला तर मी त्याच्यासाठी हजर राहणार हे नक्की.

तसेच आ. सत्यजित तांबे म्हणाले की, तिघांना मारहाण झालेली आहे ती अमानुषपणे झालेली आहे. त्याचे कोणीही समर्थन करणार नाही. ते कोणत्याही पक्षाचे असो त्यांना शिक्षा झालीच पाहिजे या मताचा मी आहे. या अगोदरही अशीच घटना झाली होती त्यावेळी गुन्हा देखील झाला होता, त्यानंतर त्या कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले परंतु तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक देविदास ढूमणे यांनी मारहाण केलेल्या कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्यासाठी पत्र दिले होते. त्याचवेळी त्या लोकांवर कारवाई झाली असती तर अशी घटना घडली नसती. त्यामुळे झालेल्या घटनेचे ढूमणे हेच दोषी असून त्यांची चौकशी झाली पाहिजे. आमच्या बरोबरचे फोटो त्यांचे प्रसारित झाले ते आमचे कार्यकर्ते असले तरी त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. पोलिसांची लक्ष नसल्याने हे प्रकार तालुक्यात घडत आहेत.

## दाट धुक्याने दृश्यमानता होतेय कमी
### वाहनांच्या गतीला लागतोय ब्रेक

◆ **शिर्डी (प्रतिनिधी):**

राहाता शहरासह ग्रामीण भागात गेली काही दिवसांपासून दररोज वातावरणात धुक्याची दाट चादर पसरत असल्याने गहू हरभरा यासह इतर पिके घेणारा शेतकरी बांधव चिंतातूर दिसत आहे दाट धुक्यांमध्ये रस्ते हरवून जाताहेत दाट धुक्यामळे दृश्यमानता कमी होत असल्याने वाहन सकाळी आठ वाजेपर्यंत वाहनाचे समोरील लाईट चालकांना इंडिकेटर व पार्किंग लाईट प्रकाशित ठेवूनच मार्गक्रमन करावे लागत आहे.



नगर ते सावळीविहीर या राष्ट्रीय महामार्गासह सर्वच रस्त्यांवर दाट धुके पसरलेले असल्याने रस्त्यावर चालणाऱ्यांना काही फुटावरील अंतरात मनुष्य अथवा इतर वस्तू दिसणे शक्य होत नाही इतके दाट धुके सर्वत्र असते. दाट धुक्यामुळे दृश्यमानता कमी होत आहे. परिणामी रस्त्यावरील वाहनधारकांना समोरचे वाहन लवकर निदर्शनास येत नाही खूप जवळ आल्यानंतर समोरून येणारे वाहन अथवा इतर बाबी दिसतात. त्यामुळे सकाळी दाट धुक्यामध्ये अपघात होण्याचा संभव लक्षात घेता अनेक अवजड वाहन चालक सकाळी धुक्यामध्ये वाहन चालविण्यास नापसंती दर्शवत आहे. शेतकरी बांधव यांची सकाळची कामे तसेच डेअरीला दूध घालणे, चारा विक्री, भाजीपाला खरेदी-विक्री यासह इतर दैनंदिन कामा निमित्त घराबाहेर बाहेर काहींना सकाळी सहा वाजताच तर काहींना भल्या पहाटेच पडावे लागते. दुचाकी वर घराबाहेर पडणाऱ्या या सर्वांना धुक्यामध्ये प्रवास करणे तसेच वाहन चालवणे धोक्याचे व जीवावर बेतणारे ठरू पाहत आहे. एकीकडे वाहन चालक यांना त्रासदायक ठरत असणारे धुके शेतकऱ्यांच्या सुद्धा मुळावर उठू पाहत आहे.हरभरा गहू यासह इतर पिकांच्या उत्पादनावर धुक्यामुळे परिणाम होऊ शकतो. त्यामुळे शेतकरी बांधवांची सुद्धा डोकेदुखी वाढत आहे. पारा खाली घसरत असल्याने भविष्यात थंडीत वाढ होण्याची शक्यता आहे. असे असले तरी निसर्गप्रेमी व पर्यावरण प्रेमी दाट धुक्याचा मनसोक्त आनंद लुटत आहे.सकाळी मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या नागरिकांना सुद्धा धुक्यातून चालताना जपून चालावे लागत आहे.दृश्यमानते मुळे त्यांना सुद्धा समोरचा अंदाज येत नाही. विद्यार्थी व चिमुकले धुके बघून मात्र आनंदित होत आहे धुक्याच्या पसरत असलेल्या दाट चादरीमुळे मात्र वाहन चालकां बरोबरच दुचाकी स्वार पादचारी पदयात्री या सर्वांच्याच गतीमानतेला मात्र काहीसा ब्रेक लागल्याचे दिसत आहे.

## डॉ. करणसिंह घुले आरोग्य दूत उपाधीने सन्मानित



**नेवासा (तालुका प्रतिनिधी):** येथील सामाजिक कार्यात व आरोग्य विषयक जनजागृतीसाठी नेहमी अग्रेसर असलेल्या समर्पण फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.करणसिंह घुले पाटील यांना टोका येथील जय मल्हार मित्र मंडळाच्या वतीने आरोग्य दूत उपाधी देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

नेवासा तालुक्यातील टोका येथील समाज मंदिर प्रांगणात नाताळ उत्सवाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात डॉ.घुले यांचा "आरोग्य दूत"ही उपाधी देऊन सन्मान करण्यात आला.त्यांच्या या कार्याबद्दल डॉ.करणसिंह घुले यांचे विविध स्तरावर अभिनंदन केले जात आहे.यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी कृषी शास्त्रज्ञ डॉ.अशोकराव ढगे,भाऊसाहेब चव्हाण,माजी सरपंच भारत गवळी,नितीन भालेराव,पास्टर किशोर बोरगे,पास्टर गाढवे,पास्टर इंगळे,जय मल्हार मित्र मंडळाचे मार्गदर्शक सुनील खंडागळे,शांतवन खंडागळे,योगेश औटी,शिवाजी पारखे,सत्यदान मोहन,राजू बिरुटे, ताराचंद गंगुले,राजेंद्र खंडागळे,किरण खंडागळे,विजय खंडागळे, संतोष खंडागळे,विनायक खंडागळे, काकासाहेब खंडागळे रविंद्र खंडागळे,संजय खंडागळे,दीपक खंडागळे,संदीप खंडागळे,सोपान खंडागळे,बाळू खंडागळे,भारत खंडागळे, नंदू सोनवणे, रविंद्र सोनवणे, संतोष मोरे,नितीन भालेराव, श्रीकांत गायकवाड,राजेंद्र खंडागळे,भरत गायकवाड यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कॉलेजचा प्राध्यापक ते विधान परिषदेचा हेडमास्तर कसरतीचे काम : ना .राम शिंदे



◆ **जामखेड (प्रतिनिधी) :**

पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा गृहमंत्री अमित शहा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माझ्यावर विश्वास टाकला व विधानपरिषद सभापतीपदी निवड केली त्यांचा विश्वास सार्थ ठरवणार आहे. कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून काम केले असल्याने विद्यार्थी कसे सांभाळायचे याचा अनुभव आहे. विधानपरिषदेत विविध पक्षाचे, विविध विचाराचे, अनुभवी व सराईत सदस्य असल्याने त्यांचा हेडमास्तर म्हणून काम करताना कसरत आहे. नेतृत्वाने विश्वास टाकल्याने ते सिध्द करायचे आहे याबाबत अवघड वाटत नाही त्यातून मार्ग काढू व नेतृत्वाचा विश्वास सार्थ ठरवू असा विश्वास विधानपरिषदेचे नवनिर्वाचित सभापती प्रा. राम शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.

दरम्यान विधानपरिषदेच्या सभापतीपदी प्रा.राम शिंदे यांची निवड झाल्याबद्दल भव्यदिव्य मिरवणूक व नागरी सत्कार रविवारी जामखेड येथील महायुतीच्या कार्यकर्त्यांनी अयोजीत केला होता.यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना सभापती प्रा. शिंदे म्हणाले, विधानसभा निवडणुकीत अल्पशा मतांनी पराभव झाला. वेगवेगळे षडयंत्र रचले गेले त्यामुळे मला व कार्यकर्ते यांना पराभव मान्य नाही. भारतीय जनता पक्षाचा २९ वर्षापासून प्रामाणिक व निष्ठेने काम करत आहे. विधानसभा निवडणुकीत सर्व कार्यकर्ते झुंजले पण पराभव अल्पशा मतांनी झाला त्यामुळे विजयी मिरवणूक काढून शकलो नाही. परंतु पक्षाने सभापतीपदासाठी संधी दिली.विधानपरिषदेत जेंव्हा सभापती पदासाठी ठराव आला त्यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, अँड. अनिल परब, भाई जगताप यांनी बहुमतानी नाही तर एकमताने ठराव पास केला. विधानसभा निवडणुकीत अल्पशा मतांनी पराभव झाला यामुळे मिरवणूक काढून शकलो नाही. सभापती निवडीनंतर प्रथमच कर्जत जामखेड मतदारसंघात आलो यामुळे कार्यकर्त्यांनी वाद्यवृंदाच्या गजरात मोठ्या उत्साहात स्वागत केले याबद्दल महायुतीचे नेते व कार्यकर्ते यांचे आभार प्रा.राम शिंदे यांनी व्यक्त केले.

### प्रा. राम शिंदेंचे चोंडी जामखेडमध्ये स्वागत

विधान परिषदेच्या सभापतिपदी वर्णी लागल्यानंतर प्रा. राम शिंदे रविवारी (दि. २९) प्रथमच जामखेड तालुक्यातील चोंडी या मुळ गावी आल्यानंतर पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे देवीचे दर्शन घेऊन महादेव मंदिरात अभिषेक केला यानंतर चोंडी गावात गुलालाची उधळण करीत मिरवणूक काढण्यात आली. यानंतर सायंकाळी चार वाजता जामखेड शहरातून भव्य दिव्य मिरवणूक भाजपसह महायुतीच्या कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण केली तसेच जेसीबीच्या साहाय्याने फुलांची उधळण केली. शिंदे यांच्या आगमनप्रसंगी ठिकठिकाणी सभापती महोदयचे बॅनर व कमानी कार्यकर्त्यांनी लावल्या होत्या. खर्डा चौकात ३० फुट उंचीचे कटआऊट सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. यावेळी क्रेनच्या साहाय्याने भला मोठा हार आ. राम शिंदे यांना घालण्यात आला. या वेळी शिंदे यांनीही हातवारे करून नृत्य केले तसेच लेझीम पथकापुढे लेझीम खेळून आनंद व्यक्त केला.

## बसचा स्टेरिंग रॉड तुटल्याने एसटी बस उलटली

◆ **कर्जत (प्रतिनिधी):**



रायगाव (ता.करमाळा) शिवारात कर्जत-करमाळा एसटी बसचा स्टेरिंग रॉड तुटल्याने बस पलटी झाली. सुदैवाने बसचालक यांच्या प्रसंगावधानाने मोठी दुर्घटना टळली असली तरी या घटनेत एकूण ३६ प्रवाशांपैकी २ जणांना गंभीर तर १५ ते २० जण किरकोळ जखमी झाले. ग्रामस्थांच्या मदतीने प्रवाशांना तात्काळ बाहेर काढण्यात यश आले.

मंगळवार, दि ३१ रोजी सकाळी ११:१५ वाजता कर्जतहुन करमाळयाकडे जाणारी करमाळा आगाराची बस (एमएच १३ सीयु ७८८३) रायगाव (ता.करमाळा) शिवारात आली असता अचानक सदरच्या बसचा स्टेरिंग रॉड तुटला. संबंधित बाब चालकांच्या लक्षात येताच त्याने ताब्यातील बस नियंत्रण मिळवत असताना बस पलटी झाली. अचानक झालेल्या घटनेने प्रवाशांमध्ये घबराट उडाली. मात्र बसचालक, वाहक आणि रायगावच्या ग्रामस्थांनी तात्काळ मदत कार्य सुरू केल्याने अवघ्या काही काळातच आत अडकलेले प्रवाशांना बाहेर काढण्यात यश आले. या बसमध्ये एकूण ३६ प्रवाशी प्रवास करीत होते. यापैकी २ जण गंभीर जखमी झाले असून इतर १५ ते २० जणांना किरकोळ स्वरूपाची दुखापत झाली. जखमींना तात्काळ करमाळा उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले. यावेळी बसची अवस्था पाहून प्रवाशांसह ग्रामस्थांनी करमाळा आगार प्रमुख यांना घटनास्थळी चांगलेच धारेवर धरले.

### बसची दयनीय अवस्था

कर्जत ते करमाळा आणि करमाळा ते कर्जत दिवसभर दोनच बस आपल्या नियोजित फेऱ्या पार पाडत असतात. मात्र रस्त्यावर धावणाऱ्या या करमाळा आगाराच्या बस अत्यंत दयनीय आणि खिळखिळया अवस्थेत धावत असतात.या बसच्या परिस्थितीबाबत अनेकदा एसटी महामंडळाकडे पाठपुरावा केला.

## नेवासा तालुक्याच्या विकासाला मोठा निधी देणार : भरत गोगावले

◆ **नेवासा (तालुका प्रतिनिधी):**

नेवासा तालुक्याला लवकरच विकास कामांसाठी मोठ्या निधीची घोषणा करणार असल्याचे आश्वासन राज्याचे रोजगार हमी फलोत्पादन व खार भूमी विकास योजना मंत्री ना.भरत गोगावले यांनी नेवासा तालुक्याचे आ.विठ्ठलरावजी लंघे यांच्या उपस्थितीत दिले.

दरम्यान आ. लंघे यांच्या निमंत्रणावरुन जगप्रसिद्ध तीर्थक्षेत्र असलेल्या शनिशिंगणापूर व श्री क्षेत्र देवगड येथील श्री दत्त देवस्थान संस्थान येथे सोमवार दि.३० रोजी दुपारी चार वाजेच्या सुमारास भेट दिली व दर्शन घेतले. यावेळी बोलतांना ना.भरत गोगावले म्हणाले की, नेवासा तालुक्याला लवकरच विकास कामासाठी मोठ्या निधीची घोषणा करणार असल्याचे आश्वासन यावेळी त्यांनी आमदार लंघे यांच्या समोर उपस्थित पदाधिकाऱ्यांना दिले यावेळी आ. विठ्ठलराव लंघे पाटील,भाजप जिल्हा उपाध्यक्ष व नेवासा विधानसभा




संयोजक सचिनभाऊ देसरडा,भारतीय जनता पार्टीचे युवा नेते ऋषिकेश शेटे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाळासाहेब पवार,नेवासा विधानसभा प्रमुख भाऊसाहेब वाघ,प्रमोद घावटे,प्रकाश गायके, प्रताप कोंगे संजय वाघमारे आदी महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.आ. विठ्ठलराव लंघे यांच्या निमंत्रणास मान देवून नेवासा येथील श्रीक्षेत्र शैनेश्वर देवस्थान व श्रीक्षेत्र देवगड देवस्थान येथे येवून दर्शन घेतले व तालुक्याला लवकरच मोठा निधी देणार असल्याचे स्पष्ट केल्यामुळे पदाधिकाऱ्यांत नवतैतन्य पसरलेले होते.

## देशाबरोबरच संपूर्ण विश्वाला समाधान मिळावे : माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद

◆ **शिर्डी (प्रतिनिधी):**

आपला देश त्याचबरोबर संपूर्ण विश्व आव्हानांचे सामना करीत असून यातून सर्वाना समाधान मिळावं अशी प्रार्थना साईबाबांना केली असल्याचे प्रतिपादन देशाचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी शिर्डीत केले.

दरम्यान माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी परिवारासह मंगळवारी शिर्डीत माध्यन्ह आरतीपूर्वी हजेरी लावत साई समाधीचे मनोभावे दर्शन घेतले.यावेळी त्यांनी साईबाबांच्या समाधीवर वस्त्र अर्पण केले. याप्रसंगी साईबाबा संस्थानच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्या हस्ते राष्ट्रपती कोविंद यांचा साई मूर्ती व शाल देऊन सत्कार केला. याप्रसंगी दादरा नगर हवेली , दिव दमन, लक्षद्विप या केंद्रशासित प्रदेशाचे प्रशासक प्रफुल्ल पटेल, जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, अप्पर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमणे, प्रशासकीय अधिकारी प्रज्ञा महांडुळे, जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके ,मंदिर प्रमुख



विष्णू थोरात, सुरक्षा अधिकारी रोहिदास माळी आदि मान्यवर उपस्थित होते.साई दर्शनानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद म्हणाले की,नववर्षाच्या निमित्ताने मला साईबाबांचे दर्शन घेण्याचे भाग्य प्राप्त झाले.देशवासियचं नव्हे तर

### सहपरिवार साई चरणी नतमस्तक

संपूर्ण मानवता जातीसाठी सुख, शांती,समृद्धी मिळावी अशी प्रार्थना साई चरणी केली असल्याचे त्यांनी म्हटले.यावेळी राजकीय विषयावर बोलण्याचे त्यांनी टाळले.साई मंदिर परिसरात येताच त्यांना बघण्यासाठी उपस्तित असलेल्या भाविकांना त्यांनी हाथ जोडून अभिवादन केले .यावेळी त्यांनी काही भाविकाकडून गुलाब पुष्प स्वीकारले. तर आपल्याकडील गुलाब पुष्प छोटया मुलीला दिले. त्यांच्या या साध्या राहणीमानाची चर्चा दिवसभर भाविकामध्ये ऐकायला मिळाली.माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी शिर्डीत येऊन दुसऱ्यांदा साई समाधीचे मनोभावे दर्शन घेतले आहे. यापूर्वी १ ऑक्टॉबर २०१७ रोजी साई समाधी शताब्दी सोहळा तसेच काकडी येथील श्री साईबाबा आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या उदघाटन प्रसंगी ते आले होते. तर देशाच्या राष्ट्रपतीपैकी रामनाथ कोविंद यांच्यासह आजतागायत नीलम संजीव रेड्डी, शंकर दयाळ शर्मा, प्रतिभाताई पाटील, प्रणव मुखर्जी,द्रोपदी मुर्म आदी साईचरणी नतमस्तक झाले आहे.

## शिर्डीत साईनामाचा जयघोष आसमंतात !

◆ **शिर्डी (प्रतिनिधी):**

सरत्या वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाच्या स्वागतासाठी देशभरातून लाखो साई भक्त शिर्डी नगरीत दाखल झाले असून तीन दिवसात पावणेदोन लाख भाविकांनी साई संस्थानच्या प्रसादालयात साईप्रसादाचा लाभ घेतला तर साधारणतः तिन लाख भाविक साईचरणी नतमस्तक.

दरम्यान देशातील नंबर दोनचे श्रीमंत देवस्थान म्हणून नावारूपास मिळविलेल्या आंतरराष्ट्रीय तीर्थक्षेत्र शिर्डी येथे श्री साईबाबांच्या नगरीत नवीन वर्षाच्या स्वागतासाठी आणि सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी जगभरातून लाखो भाविक हजेरी लावत असतात. २०२४ ला बाय बाय आणी २०२५ च्या स्वागतासाठी रविवार पासून शिर्डीत भाविकांच्या गर्दीचा ओघ दिसून आला आहे. त्या पार्श्वभूमीवर साईबाबा संस्थान, पोलीस प्रशासन, शिर्डी नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने भाविकांना

### २०२४ ला अलविदा करण्यासाठी लाखो भाविक नतमस्तक



सुविधा देण्यासाठी सर्व प्रकारची यंत्रणा तत्पर ठेवली होती. सोमवार आणि मंगळवार नगर मनमाड महामार्गावर वाहनांच्या लांब रांगा लागल्याचे चित्र पाहावयास मिळाले. साईबाबा संस्थानसह शहरातील हॉटेल, लॉजिंग फुल झाले.शहरातील सर्व रस्ते गर्दीने फुलून गेले होते. सर्वत्र पालख्या पदयात्रीचा साई नामाचा जयघोषाने साईबाबांची नगरी भक्तिमय वातावरनात चिंब झाली होती.संस्थानच्या वतीने ठिकठिकाणी पालख्यांचे स्वागत करण्यात आले.

शिर्डी महोत्सवा निमित्त बेंगलोर येथील दानशूर साईभक्त बी.ए. बसवराज यांच्या देणगीतुन मंदिर व परिसरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली. मंगळवारी रात्री म्हणजे ३१ डिसेंबर रोजी साई मंदिर रात्रभर दर्शनासाठी खुले ठेवण्यात आले होते.दरवर्षी प्रमाणे रात्री बारा वाजता साई मंदिर परिसरात हजारोंच्या संख्येने

सरत्या वर्षाला निरोप आणी नवीन वर्षाच्या स्वागतासाठी श्रद्धा आणी सबुरीचा संदेश देणाऱ्या श्री साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत दरवर्षी नाताळ पासूनचं अनेक मंत्री,अभिनेते,सेलिब्रेटी, क्रिकेटर, उद्योगपती, आमदार, खासदार आदी बडी मंडळींनी आवर्जून हजेरी लावली असून काल ३१ डिसेंबर ला देशाचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी हजेरी लावत साई समाधीचे दर्शन घेतले. तर केंद्रिय कृषिमंत्री शिवराजसिहं चौहान हे दरवर्षीप्रमाणे शिर्डीत ३१ डिसेंबर ला आवर्जून उपस्थित असतात.

भाविकांनी उपस्थिती लावून नवीन वर्षाचे स्वागत केले.यावेळी आकाशात फटाक्यांची आतिषबाजी बघायला मिळाली.

यावेळी भाविकांनी साईबाबांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा देत प्रार्थना केली शहरात ठीक ठिकाणी पोलिसांचा चौक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## त्रिमूर्तीचे दोन खेळाडू राष्ट्रीय रायफल शूटिंग स्पर्धेसाठी रवाना



**नेवासा (तालुका प्रतिनिधी):** १ जानेवारी २०२५ ते ७ जानेवारीपर्यंत भोपाळ मध्यप्रदेश या ठिकाणी संपन्न होणाऱ्या शालेय राष्ट्रीय रायफल शूटिंग स्पर्धेसाठी नेवासा फाटा येथील त्रिमुर्ती शैक्षणिक संकुलातील दादासाहेब हरिभाऊ घाडगे पाटील विद्यालयाची कु. निकिता अमोल रोकडे ही १९ वर्षे १० मीटर ओपन साईट रायफल खेळ प्रकारात तर त्रिमूर्ती पब्लिक स्कूलचा विद्यार्थी साहिल गजानन सोनुने याने १० मीटर ओपन साईट खेळ प्रकारात सहभाग नोंदवत दोघेही खेळाडू महाराष्ट्र टीमचे प्रतिनिधित्व करत सहभाग नोंदवणार आहेत.

त्रिमूर्ती रायफल शूटिंग अकॅडमीचे प्रशिक्षक छबुराव काळे हे १४ वर्षे वयोगटातील मुलांच्या टीम करता महाराष्ट्र टीमचे व्यवस्थापक म्हणून काम पाहणार आहेत वरील सर्व खेळाडू व प्रशिक्षक यांना पुढील स्पर्धेसाठी संस्थेच्या विविध मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. तसेच वरील यशस्वी खेळाडूंना त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानचे संस्थापक साहेबराव घाडगे पाटील,अध्यक्षा ॲड.सौ. सुमतीताई घाडगेपाटील,उपाध्यक्षा स्नेहलताई घाडगेपाटील,सचिव मनीष घाडगे पाटील, एनडीए प्रमुख, कर्नल के पी सिंग, टी एम एस विद्यालयाचे प्राचार्य,सोपान काळे, टी पी एस चे प्राचार्य सचिन कर्डीले, दत्तात्रय वांढेकर, त्रिमूर्ती सिनिअर कॉलेजच्या श्रीमती अनुराधा गोरे तसेच प्राचार्य अडसुळे, मुख्य संजयसिंग चव्हाण यांच्यासह सर्व शिक्षक शिक्षेत्तर कर्मचारी व पालक वर्गांनी सुभेच्छा दिल्या.

**दैनिक बीड सुपरफास्ट** हे पत्र मुद्रक बालाजी मारुती खैरमोडे यांनी प्रकाशक व मालक **अतुल शंकरराव जाधव** यांच्यासाठी बालाजी प्रिंटर्स ॲण्ड पब्लीकेशन, हनुमान नगर, अंबाजोगाई, जि. बीड, ४३१५१७ ( महाराष्ट्र राज्य) येथून छापून, **दैनिक बीड सुपरफास्ट** कार्यालय, नगर पालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, ब्लॉक नं. ४१, मोहन टॉकीजसमोर, परळी रोड, अंबाजोगाई, तालुका : अंबाजोगाई, जिल्हा बीड ४३१५२३ (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. **संपादक : अतुल शंकरराव जाधव**

Printed By BALAJI MARUTI KHAIRMODE and published by ATUL SHANKARRAO JADHAV on behalf of DAILY BEED SUPERFAST (Name of Owner) ATUL SHANKARRAO JADHAV and printed at BALAJI PRINTERS AND PUBLICATION HANUMAN NAGAR AMBAJOGAI TALUKA AMBAJOGAI DISTRICT BEED 431517 (MAHARASHTRA STATE) (place of printing) and Published at AMBAJOGAI DISTRICT BEED (MAHARASHTRA STATE) (place of publication) 'BEED SUPERFAST' OFFICE : NAGAR PALIKA SHOPPING COMPLEX, BLOCK NO 41, FRONT OF MOHAN TAKIES, PARLI ROAD, AMBAJOGAI, TALUKA AMBAJOGAI, DISTRICT BEED, PIN - 431517 (MAHARASHTRA STATE) editor ATUL SHANKARRAO JADHAV